❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती मंगळवार, दि. ०१ सप्टेंबर २०२६ ❖ पाने : ८ ❖ अंक : २४७ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्षे निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक




संध्या प्रहार




# लाल संविधानाच्या नावाखाली काँग्रेसचा माओवाद!

## देवेंद्र फडणवीसांचा हल्लाबोल, सीजेपी म्हणजे काँग्रेस जिताओ प्रोग्रॅम!

■ पुणे (दै. संध्या)

लाल संविधानाच्या नावाखाली देशात काँग्रेसचा माओवाद सुरू आहे. तर सीजेपी म्हणजे छोटी संघटना नाही, तर CJP म्हणजे काँग्रेस जिताओ प्रोग्रॅम आहे. या प्रोग्रॅममध्ये चार-पाच पोरे जे समोर दिसतात ते नाहीत. ते फक्त मोहरे आहेत. भारत जोडोच्या 180 संघटना त्यामागचे खरे सूत्रधार आहेत, असा आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला. ते पुण्यात बोलत होते.



भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश कार्यकारिणीची महत्त्वपूर्ण बैठक पुण्यात पार पडली. भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला पक्षाचे आमदार, खासदार, जिल्हाध्यक्ष, प्रदेश पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर ही रवींद्र चव्हाण यांची पहिलीच प्रदेश कार्यकारिणी बैठक असल्याने या बैठकीकडे पक्षाच्या संघटनात्मक पातळीवर विशेष महत्त्वाने पाहिले गेले. बैठकीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या भाषणातून विरोधकांवर सडकून हल्लाबोल केला. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, सीजेपी म्हणजे छोटी संघटना नाही, तर CJP म्हणजे काँग्रेस जिताओ प्रोग्रॅम आहे. या प्रोग्रॅममध्ये चार-पाच पोरे जे समोर दिसतात ते नाहीत. ते फक्त मोहरे आहेत. भारत जोडोच्या 180 संघटना त्यांच्या बैठकीला आहेत. यांनी लोकसभेत आणि विधानसभेत नेरेटिव्ह केले. मात्र, ते हरले. आता तेच नवीन नाव घेऊन उतरतायत. रामायणात कालनेमी होता. तो वेगवेगळे वेष घ्यायचा. आपले राक्षसी नाव घेऊन जायचा. मात्र, प्रभू श्रीरामाचे नाव घेतले आणि कालनेमी सुद्धा जिंकला नाही. आम्ही केवळ प्रभू रामांचे नाव घेणारे नाही, तर त्यांच्या तत्वाप्रमाणे राज्य करणारे लोक आहोत. देवेंद्र फडणवीस म्हणाले, नाव संविधानाचे घेऊन अराजकता निर्माण करण्याचे काम सध्या देशात सुरू आहे. हे संविधान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिले आहे, याचा कोणी दुरुपयोग केला तर त्याचे हात जळून खाक झाल्याशिवाय राहणार नाही. बाबासाहेबांना सर्वात प्रिय असलेले मूलभूत अधिकार, हे मूलभूत अधिकार संपवण्याचे काम कॉंग्रेसने केले होते. आज ते लाल संविधान घेऊन फिरत आहेत, नाव संविधान आहे, पण त्याच्यामध्ये माओवाद आहे. छात्रों की गुंज नसून झुट की गुंज आहे. ते सांगतात भारत देश पितृसत्ताक आहे, इथे महिलांना जागा नाही. पण मला तुम्हाला सांगायचे आहे की ही जी पिढी आहे, मी त्यांना जेनझी म्हणत नाही, ती युवा शक्ती आहे. देवेंद्र फडणवीस म्हणाले, माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिलांना लोकसभेत आणि विधानसभेत आरक्षण आणण्यासाठी कायदा आणला आणि आता हा कायदा लागू करायचा आहे. 2023 साली हे बिल, हा कायदा आला, यात काय होते, महिलांना 33 टक्के आरक्षण, डिलिमिटेशन होते.

### प्रियंका गांधी यांना संधी का दिली नाही?

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, आज खऱ्या अर्थाने मातृसत्ताकचे प्रतीक काय असेल तर ते वंदे मातरम् आहे. हे गीत सुरू झाले की सोनियाजींनी थयथयाट सुरू केला आणि ते गीत थांबवायला लावले. हे गीत गात गात अनेक स्वातंत्र्यसैनिक फासावर गेले. चित्रा वाघ यांनी एक प्रश्न उपस्थित केला होता, की राहुल गांधी सांगा, या ठिकाणी खऱ्या अर्थाने महिलांना संधी देण्याची वेळ होती, तेव्हा प्रियंका गांधी यांना संधी का दिली नाही? एकीकडे महिलांच्या बद्दल बोलायचं आणि दुसरीकडे आपल्या सगळ्यांना माहीत आहे की ज्यावेळी सुप्रीम कोर्टाने मुस्लिम महिलांना पोटगीचा अधिकार आहे त्यावेळी कॉंग्रेसने कायदा आणून हा निर्णय रद्द करायला लावला होता.

### सांस्कृतिक उत्सव साजरा करण्याची क्षमता पुण्यातच

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, लोक मला विचारणार की तुम्ही गणेशोत्सवाच्या संदर्भात बोललात, तर त्यात डीजे वाजला पाहिजे का? असा प्रश्न विचारणार. मी पुणेकरांना सांगू इच्छितो की पुण्यातच ही क्षमता आहे की संपूर्ण सांस्कृतिक पद्धतीनेच उत्सव साजरा केला जाऊ शकतो. त्यामुळे या वादात न पडता पुणेकरांनी दाखवून दिले पाहिजे की सांस्कृतिक पद्धतीने उत्सव कसा साजरा केला जाऊ शकतो.

## थोडक्यात...

### १२ तारखेपर्यंत मुंबई गाठा : जरांगेंचे आवाहन

आंतरवाली सराटी : दैनिक संध्या



मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या अंतरवाली सराटी येथील 11व्या आमरण उपोषणाचा आज तिसरा दिवस आहे. जरांगे पाटील यांनी मराठा बांधवांना आजपासूनच १२ तारखेपर्यंत मुंबईत पोहोचण्याचे आवाहन केले आहे. "थेट आझाद मैदानात जाऊ नका. मराठे मुंबईत आल्याचे कोणालाही समजता कामा नये. पुढील १२ दिवस हे सत्र सुरू ठेवा आणि आपापल्या पाहुण्यांकडे किंवा मित्रांकडे मुक्काम करा," अशी सूचना जरांगेंनी दिली आहे. जर पोलिसांनी कारवाई करून उचलून नेले, तरी न घाबरता बिनधास्त पोलिस स्टेशनमध्ये राहा, तिथेच तुमची राहण्याची सोय होईल आणि कोणाकोणाला उचलले हे मी नंतर बघतो, असेही जरांगे म्हणाले. आपल्या उपोषणावर ठाम असल्याचे स्पष्ट करत, आपण कोणत्याही परिस्थितीत उपोषण सोडणार नसून थेट मुंबईलाच येणार असल्याची मोठी घोषणा जरांगे यांनी केली आहे.

### फडणवीस हे मराठाद्वेष्टे

मुंबई : दैनिक संध्या

मनोज जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणाचा आज तिसरा दिवस असून, त्यांच्या आंदोलनावरून राजकीय वातावरण तापले आहे. ठाकरे गटाचे नेते आणि आमदार भास्कर जाधव यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार टीका केली आहे. फडणवीस हे मराठाद्वेष्टे असून, प्रत्येकवेळी नवीन शासन निर्णय (GR) काढून जरांगे पाटील यांचे उपोषण सोडवले जाते आणि त्यानंतर त्यांचा विश्वासघात केला जातो, असा आरोप जाधव यांनी केला.

### अमित ठाकरेंवर गुन्हा दाखल करा : भाजप

पुणे : दैनिक संध्या

पुण्यातील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराजांच्या शेजारी लावलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या फोटोला मनसे नेते अमित ठाकरे यांनी केलेल्या विरोधानंतर आता राजकीय वातावरण तापले आहे. या प्रकरणावर नवनाथ बन यांनी तीव्र संताप व्यक्त करत अमित ठाकरे यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. अमित ठाकरे यांनी थेट देशाच्या पंतप्रधानांचा अपमान केला आहे. तिथे नरेंद्र मोदी म्हणून नाही, तर देशाचे पंतप्रधान म्हणून तो फोटो लागला होता. सरकारी कार्यालयांमध्ये पंतप्रधानांचा फोटो लावण्याची परंपरा नवीन नाही, काँग्रेसच्या काळातही असे फोटो लावले जायचे. केवळ भाजपला टार्गेट करून प्रसिद्धी मिळवण्याचा हा प्रयत्न असून, अशा मुद्द्यांमुळे तुम्ही तोंडावर पडाल," अशी घणाघाती टीका नवनाथ बन यांनी केली आहे. नवनाथ बन यांच्या मागणीवर अमित ठाकरे यांनीही तत्काळ पलटवार केला आहे. कारवाईच्या इशाऱ्यांना न जुमानता आपल्या भूमिकेवर ठाम राहत अमित ठाकरे म्हणाले की, "माझ्यावर याआधी दाखल झालेला पहिला गुन्हा हा छत्रपती शिवाजी महाराजांसाठीच होता. आता या प्रकरणात महाराजांच्या सन्मानासाठी माझ्यावर दुसरा गुन्हा जरी दाखल झाला, तरी मला चालेल." अमित ठाकरेंच्या या प्रत्युत्तरामुळे फोटोवरून सुरू झालेले हे राजकारण आता आणखी चिघळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## एसआयआर अंतर्गत महाराष्ट्राच्या प्रारुप मतदार यादीतून २ कोटी नावं वगळली

■ मुंबई (दै. संध्या)

भारत निवडणूक आयोगाच्या आदेशानं महाराष्ट्रात मतदार यादीचं विशेष सखोल पुनरीक्षण-२०२६ सुरु आहे. या प्रक्रियेतील नव्या वेळापत्रकानुसार महाराष्ट्र शासनाच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं आज राज्यातील मतदारांची विशेष सखोल पुनरीक्षण-२०२६ प्रारुप मतदार यादी जाहीर केली आहे. या यादीतून 2 कोटी 6 लाख 88 हजार 487 नावं वगळण्यात आली आहे. अंतिम मतदार यादी 4 नोव्हेंबर 2026 रोजी जाहीर केली जाणार आहे. तत्पूर्वी एसआयआर प्रारुप मतदार यादीतून जी 2 कोटींहून अधिक नावं वगळण्यात आली आहेत त्यामध्ये किंवा प्रारुप मतदार यादीत तुमचं नाव आहे का हे कसं तपासायचं हे जाणून घेणार आहोत. महाराष्ट्र शासनाच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने प्रसिद्ध केलेल्या विशेष सखोल पुनरीक्षण-2026 प्रारुप मतदार यादी नुसार सखोल पुनरीक्षणापूर्वी 9,78,54,049 मतदार होते. मात्र, एसआयआर प्रक्रियेनंतर प्रारुप यादीतील मतदारांची संख्या 7 कोटी 71 लाख 65 हजार 562 मतदारांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये पुरुष मतदारांची संख्या 3 कोटी 95 लाख 89 हजार 905 इतकी आहे. तर, स्त्री मतदारांची संख्या 3 कोटी 75 लाख 72 हजार 570 इतकी आहे. राज्यातील तृतीयपंथी मतदारांची संख्या 3087 इतकी आहे. महाराष्ट्राच्या विशेष सखोल पुनरीक्षण-2026 प्रारुप मतदार यादीतून वगळलेल्या किंवा गणना न झालेल्या मतदारांची संख्या 2 कोटी 6 लाख 88 हजार 487 इतकी आहे. याची कारणं गैरहजर, स्थलांतरित, मृत, किंवा दुबार नोंदणी अशी आहेत. प्रथम तुम्ही मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांच्या वेबसाईटला किंवा भारत निवडणूक आयोगाच्या वेबसाईटला भेट द्या. सीईओ महाराष्ट्र वेबसाईटला भेट दिल्यानंतर तिथं प्रारुप मतदार यादी SIR 2026 हा पर्याय दिसेल. त्यावर क्लिक करुन पुढं जावे. त्यानंतर निवडणूक आयोगाचं नवं पेज ओपन होईल.



## भाजपच्या प्रदेश कार्यकारिणी बैठकीत FDAची एन्ट्री

### नेत्यांच्या जेवणाचे नमुने घेतले, राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण

■ पुणे (दै. संध्या)

राज्यात सध्या भेसळयुक्त आणि निकृष्ट अन्नपदार्थांविरोधात अन्न व औषध प्रशासनाने कारवाईचा धडाका सुरू केला आहे. मंत्रालयातील खानावळीपासून हॉटेल्स आणि विविध खाद्य आस्थापनांवर तपासण्या करत FDA कडून नमुने घेतले जात आहेत. याच पार्श्वभूमीवर पुण्यात भाजपच्या प्रदेश कार्यकारिणीच्या बैठकीच्या ठिकाणी FDA पथकाने अचानक भेट देत नेत्यांसाठी तयार करण्यात आलेल्या जेवणाची तपासणी केली. अधिकाऱ्यांनी विविध अन्नपदार्थांचे नमुने ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे.

पुण्यातील स्वारगेट परिसरातील गणेश कला क्रीडा केंद्रात सोमवारी भाजपच्या प्रदेश कार्यकारिणीची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या बैठकीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह पक्षाचे मंत्री, खासदार, आमदार, प्रदेश पदाधिकारी आणि राज्यभरातील प्रमुख कार्यकर्ते उपस्थित आहेत. या बैठकीसाठी उपस्थित नेते आणि पदाधिकाऱ्यांच्या जेवणाची विशेष व्यवस्था करण्यात आली होती.

FDA MAHARASHTRA

बैठक सुरू असतानाच FDA चे पथक अचानक बैठकीच्या ठिकाणी दाखल झाले. मिळालेल्या माहितीनुसार, FDA चे चार कर्मचारी कार्यक्रमस्थळी पोहोचले आणि नेत्यांसाठी तयार करण्यात आलेल्या जेवणाची पाहणी केली. त्यानंतर पथकाने काही अन्नपदार्थांचे नमुने तपासणीसाठी घेतले. FDA पथकाच्या या अचानक भेटीमुळे बैठकीच्या ठिकाणी उपस्थितांमध्येही उत्सुकता निर्माण झाली. भाजपची प्रदेश कार्यकारिणीची बैठक आणि त्यातील राजकीय चर्चेपेक्षा सध्या नेत्यांसाठी तयार करण्यात आलेल्या जेवणाच्या तपासणीचीच अधिक चर्चा होत आहे.

FDA अधिकाऱ्यांनी घेतलेल्या अन्नपदार्थांच्या नमुन्यांमध्ये नेमके काय आढळले, याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. मात्र, प्राथमिक तपासणीदरम्यान कोणताही आक्षेपार्ह प्रकार आढळला नसल्याचा दावा भाजपकडून करण्यात आला आहे. भाजपचे प्रवक्ते विनायक आंबेकर यांनीही FDA चे अधिकारी कार्यक्रमस्थळी आले होते आणि त्यांनी अन्नपदार्थांची तपासणी केल्याचे सांगितले. अधिकाऱ्यांनी जेवणाचे नमुने घेतले असून, तपासणीदरम्यान त्यांना काही आक्षेपार्ह आढळले नसल्याचे आंबेकर यांनी म्हटले आहे. अंतिम अहवालानंतरच नमुन्यांबाबतची वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे. राज्यात सध्या अन्नपदार्थांमधील भेसळ, निकृष्ट दर्जा आणि अन्नसुरक्षेच्या नियमांचे उल्लंघन याविरोधात FDA कडून तपासणी आणि कारवाई सुरू आहे. विविध हॉटेल्स, खानावळी तसेच खाद्यपदार्थ तयार करणाऱ्या आणि विक्री करणाऱ्या आस्थापनांची तपासणी केली जात आहे.

त्यामुळे भाजपसारख्या सत्ताधारी पक्षाच्या महत्त्वाच्या बैठकीच्या ठिकाणीही FDA पथक पोहोचल्याने या कारवाईला विशेष राजकीय संदर्भ प्राप्त झाला आहे. मात्र, ही तपासणी नियमित अन्नसुरक्षा तपासणीचा भाग होती की विशेष कारणास्तव करण्यात आली, याबाबत अधिकृतपणे स्पष्टता झालेली नाही.

## डीजे-लेझरमुक्त गणेशोत्सवाचा 'पुणे पॅटर्न' निर्माण करा

### *मेधा कुलकर्णींचा सवाल- 'अंगविक्षेप कृष्णाला, गणपतीला आवडेल का?'*

■ पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्यातील गणेशोत्सव जगभर प्रसिद्ध आहे. या पार्श्वभूमीवर, राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी महाराष्ट्रासाठी गणेशोत्सवाचा आदर्श घालून देणारा 'पुणे पॅटर्न' तयार करण्याची मागणी केली आहे. डीजे, प्लाझ्मा आणि लेझर लाईटसारख्या गोष्टींवर पूर्णपणे बंदी घालावी, असे परखड मत त्यांनी व्यक्त केले.



कोणत्याही जाती-धर्माचा सण किंवा उत्सव असला तरी कायद्याची कडक अंमलबजावणी व्हावी, असे डॉ. कुलकर्णी म्हणाल्या. उत्सवांमध्ये डीजे, प्लाझ्मा आणि लेझर लाईटचा वापर पूर्णपणे थांबवावा, अशी त्यांची भूमिका आहे.

दहीहंडी आणि गणेशोत्सवातील वर्तनावर त्यांनी गंभीर प्रश्न उपस्थित केला. अर्धनग्न अवस्थेत महिला दहीहंडीसाठी येऊन अंगविक्षेप करत असतील, तर हे श्रीकृष्ण किंवा गणपतीला आवडेल का, असा सवाल त्यांनी केला. मंडळांनी, कार्यकर्त्यांनी आणि लोकप्रतिनिधींनी यावर विचार करायला हवा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

गेल्या अनेक वर्षांपासून डीजे, गोंगाट आणि उत्सवाला गालबोट लावणाऱ्या गोष्टींविरोधात आपण भूमिका मांडत आलो असल्याचे प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी सांगितले. त्यामुळे केवळ गणेशोत्सवच नाही, तर कोणत्याही सार्वजनिक कार्यक्रमांमध्येही डीजेचा दणदणाट बंद व्हावा, अशी त्यांची इच्छा आहे. सण-उत्सवांच्या काळात वाजणाऱ्या कर्णकर्कश डीजेमुळे लहान मुले, वृद्ध नागरिक, उच्च रक्तदाब आणि इतर गंभीर आजारांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांना तीव्र त्रास सहन करावा लागतो. उत्सव साजरा करत असताना या सगळ्याचा अवश्य विचार व्हायला हवा, असे त्यांनी नमूद केले. गोंगाटामुळे उत्सवाच्या काळात नागरिकांना शहरातून स्थलांतरित होण्याची वेळ येऊ नये. न्यायालयाने घालून दिलेल्या आवाजाच्या मर्यादा आणि नियमांचे काटेकोर पालन करावे. तसेच, गणेशोत्सवाच्या काळात गुटख्याच्या किंवा आरोग्यास घातक असणाऱ्या उत्पादनांच्या सरोगेट (छुप्या) जाहिराती स्वीकारू नयेत, असे आवाहनही त्यांनी केले. लोकमान्य टिळक यांनी समाजप्रबोधनाच्या उद्देशाने गणेशोत्सव सार्वजनिक केला होता. त्यामुळे यामध्ये व्याख्याने, वैचारिक देवाणघेवाण, मुलांसाठी विविध स्पर्धा आणि सांस्कृतिक उपक्रम यांसारख्या समाजासाठी उपयुक्त गोष्टी व्हायला हव्यात. पुण्यातील बरीच मंडळे अशाप्रकारे प्रबोधनपूर्ण उत्सव साजरा करतात, अशा मंडळांचा आदर्श सर्वांनी घ्यावा, असे डॉ. कुलकर्णी म्हणाल्या.

अश्लील गाणी आणि धर्माला न शोभणारे वर्तन अशाप्रकारे उत्सव साजरे करू नयेत. पोलीस प्रशासनाने कायदा व सुव्यवस्थेचे रक्षण करताना सभ्यता राखावी आणि सर्वसामान्य पुणेकरांना आपल्या हक्कासाठी रस्त्यावर उतरण्याची वेळ येऊ नये, अशी परिस्थिती निर्माण करावी, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. आपल्या देशात ध्वनीप्रदूषणाकडे मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष केले जाते, तर इतर देशांत पर्यावरण जपण्यासाठी कडक नियम आहेत, याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

यावर्षी पुण्यातील सुमारे २०० गणेश मंडळांनी डीजे न वापरता विधायक व पारंपरिक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांचे अनुकरण इतर मंडळांनीही करावे आणि हा उत्सव समाजातील सगळ्यांनाच सुसह्य कसा होईल, याकडे प्रामुख्याने लक्ष द्यायला हवे, असे आवाहन त्यांनी केले.

## योजनांचा लाभ घ्यावा डॉ. नीलम गोऱ्हे



■ पुणे (दै. संध्या)

भटके-विमुक्त समाजाच्या विकासासाठी केंद्र आणि राज्य शासनाने अनेक योजना सुरू केल्या आहेत. मात्र, या योजनांचा लाभ समाजातील प्रत्येक विद्यार्थी, महिला आणि बालकांपर्यंत पोहोचवण्यासाठी अधिक प्रभावी प्रयत्नांची गरज आहे, असे आवाहन शिवसेना नेत्या आणि विधान परिषद सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केले. डॉ. गोऱ्हे पुणे येथील फर्ग्युसन महाविद्यालयातील ॲम्फी थिएटर सभागृहात आयोजित राज्यस्तरीय 'भटके-विमुक्त दिवस' कार्यक्रमात बोलत होत्या. महाराष्ट्र शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाने हा कार्यक्रम आयोजित केला होता. महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन झाले, तर इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. भटके-विमुक्त समाजातील महिलांना सामाजिक, आर्थिक वंचिततेसोबतच लिंगभेदाचाही सामना करावा लागतो, असे डॉ. गोऱ्हे यांनी नमूद केले. या भेदभावाविरोधात व्यापक जनजागृती करणे आवश्यक आहे. महिलांचे शिक्षण, आर्थिक सक्षमीकरण, सुरक्षितता आणि कायदेविषयक जागरूकतेसाठी स्वतंत्र व परिणामकारक उपक्रम राबवण्याचे आवाहन त्यांनी केले. उपजीविकेसाठी गावोगावी फिरणाऱ्या समाजातील नागरिकांकडे संशयाने पाहण्याची मानसिकता बदलली पाहिजे. त्यांना सन्मान आणि समान संधी मिळणे आवश्यक आहे, असेही डॉ. गोऱ्हे म्हणाल्या.

# संपादकीय

## मुलं आणि पालक : संवादाचा हरवलेला पूल

आजच्या काळात मुलं आणि पालक यांच्यातील नातं एका वेगळ्याच वळणावर उभं आहे. एकाच घरात राहूनही दोन पिढ्या अनेकदा मनाने दूर जाताना दिसतात. घरात सुविधा वाढल्या, संवादाची साधनं वाढली; पण प्रत्यक्ष संवाद मात्र कमी झाला. मोबाईलच्या स्क्रीनवर जग जवळ आलं, पण कधी कधी घरातली माणसं मात्र दूर गेली. आजची Gen पिढी ज्या पालकांच्या घरात वाढते आहे, त्या पालकांचा मोठा वर्ग 1980 ते 2000 या काळात जन्मलेला आहे. या पिढीने अभावाचं जगही पाहिलं आणि तंत्रज्ञानाचा वेगही अनुभवला. त्यांच्या बालपणी साधेपणा, काटकसर, कष्ट आणि परिस्थितीशी जुळवून घेणं होतं; तर त्यांच्या मुलांसमोर आज असंख्य पर्याय, तंत्रज्ञान आणि स्पर्धेचं जग आहे.

म्हणूनच दोन्ही पिढ्यांच्या अपेक्षा आणि जगण्याची भाषा वेगळी असणं स्वाभाविक आहे.

पालकांना मुलांनी चांगलं शिकावं, स्वतःच्या पायावर उभं राहावं, सुरक्षित भविष्य घडवावं असं वाटतं. त्यांच्या कठोरपणामागे अनेकदा स्वतःच्या संघर्षातून आलेली काळजी असते. त्यांनी जे भोगलं, ते आपल्या मुलांनी भोगू नये, हीच त्यांची धडपड असते. पण हीच काळजी कधी तुलना आणि सततच्या अपेक्षांच्या रूपात व्यक्त होते. "अमुक मुलाला एवढे गुण मिळाले." "तुझ्या भावाने किंवा बहिणीने हे करून दाखवलं." "तुला एवढंही जमत नाही?" पालकांसाठी ही कदाचित क्षणिक नाराजी असते; पण मुलाच्या मनात त्याचा अर्थ वेगळा उमटू शकतो-जसे की "मी पुरेसा चांगला नाही, मी व्यवस्थित नाही,मला काहीच जमत नाही".

म्हणून मुलांना घडवताना त्यांच्या गुणांकडे पाहण्याइतकंच त्यांच्या मनाकडे पाहणंही गरजेचं आहे. दुसरीकडे आजच्या मुलांची बाजूही समजून घ्यावी लागेल. शैक्षणिक स्पर्धा, करिअरची अनिश्चितता, सोशल मीडियावरील सततची तुलना, मैत्री आणि नात्यांमधील ताण, स्वतःला सिद्ध करण्याची धडपड-या सगळ्याचा त्यांच्या मनावर परिणाम होत असतो. बाहेरून आनंदी दिसणारं मूल आतून अस्वस्थ असू शकतं. मुलांच्या वागण्यात अचानक बदल झाला, ते एकटे राहू लागले, सतत चिडचिड करू लागले, आवडत्या गोष्टींमध्ये रस उरला नाही किंवा स्वतःबद्दल निराश किंवा नकारात्मक बोलू लागले, तर त्याला फक्त हट्ट किंवा आळस समजू नये.

कधी कधी शांत झालेलं मूल मदतीसाठी हाक देत असतं. नैराश्य आणि आत्महत्येच्या घटना ही केवळ बातमी नसते; ती एका कुटुंबाच्या आणि समाजाच्या संवेदनशीलतेची परीक्षा असते. प्रत्येक घटनेमागे कारणांची गुंतागुंत असते. त्यामुळे दोष देण्यापेक्षा मुलाला संकटाच्या वेळी मन मोकळं करता येईल अशी सुरक्षित जागा निर्माण करणं अधिक महत्त्वाचं आहे. गरज भासल्यास समुपदेशक किंवा मानसिक आरोग्य तज्ज्ञांची मदत घेणं ही कमजोरी नसून जबाबदारी आहे.

मात्र या चर्चेत पालकांची बाजूही तितकीच महत्त्वाची आहे. आजचा पालकही तणावाखाली आहे. आर्थिक जबाबदाऱ्या, मुलांचं शिक्षण, नोकरी-व्यवसायातील स्पर्धा, वृद्ध आई-वडिलांची काळजी आणि भविष्यातील सुरक्षिततेची चिंता-या सगळ्यांमध्ये तो स्वतःही अनेकदा थकलेला असतो.

मुलाला अभ्यास कर म्हणतो, कारण त्याला भविष्यातील स्पर्धेची चिंता असते. तो पैशांचा हिशेब सांगतो, कारण त्याने स्वतः आर्थिक अडचणी अनुभवल्या असतात. तो मोबाईलवर मर्यादा घालतो, कारण त्याला त्यातील धोके जाणवतात. त्याच्या प्रत्येक कठोर शब्दामागे नियंत्रण असेलच असं नाही; कधी कधी त्यामागे असते ती काळजीची चुकीची भाषा. म्हणून पालकांनी मुलांना बदलण्यापूर्वी त्यांना समजून घ्यावं आणि मुलांनीही पालकांच्या प्रत्येक "नाही" मध्ये बंधन शोधण्यापूर्वी त्यामागची चिंता समजून घ्यावी. मतभेद असणं चुकीचं नाही. पण मतभेद मनभेदात बदलू नयेत. पालकांनी प्रत्येक वेळी "मी मोठा आहे, म्हणून माझं बरोबर" असं म्हणू नये. आणि मुलांनीही "तुम्हाला काहीच कळत नाही" म्हणून पालकांच्या अनुभवाला नाकारू नये.

## संस्कृत सुभाषित

कृत न प्रतिकुर्यात् य: पुरुषाणां स दूषण: कृते
च प्रतिकर्तव्यं एष: धर्म सनातन: ।।

अर्थ : कृतीला प्रत्युत्तर न देणे हे पुरुषाला दूषणास्पद आहे आणि प्रत्युत्तर देणे हा सनातन धर्म आहे, असा पुरुषार्थ यात सांगितला आहे.

## गुरु वचन

### समान भावाने सेवा

एका वेळची गोष्ट आहे. ईश्वरचंद विद्यासागर यांच्याजवळ त्यांच्या मित्राचा एक नोकर काही कामानिमित्त आला. विद्यासागर बाहेर आले आणि त्यांनी पाहिले तर घराच्या खाली एक वयस्कर व्यक्ती उभा होता. आणि तो खूप थकलेला होता. अशा स्थितीत तो वरती येण्यास असमर्थ होता. हे पाहून विद्यासागर त्या व्यक्तीसाठी पिण्यास पाणी घेऊन आले आणि परत जाऊन पंखा घेऊन आले आणि स्वत: हवा मारु लागले. विद्यासागरना असे करताना पाहून त्यांचा मित्र म्हणाला ज्या व्यक्तीस आपण पाणी पाजत आहात आणि पंख्याने हवा मारत आहात तो एक सामान्य सेवक आहे. मित्राचे हे बोलणे ऐकून विद्यासागर म्हणाले ठीक आहे, हा एक सेवक आहे, परंतु माणूसच आहे.

यावरुन विद्यासागर यांनी मित्राला आपल्या लहानपणीची एक गोष्ट सांगितली, माझे वडील एकदा बाजारात चक्कर येऊन पडले. तेथे चन्ना विकणाऱ्या एका व्यक्तीने आपले काम सोडून ताबडतोब पाणी आणले आणि त्याचा शिडकावा मारला आणि नंतर पंखा आणून त्याने हवाही मारु लागला, असे करत असताना तो आपले सामानही विसरुन गेला. त्याला केवळ माझ्या वडिलांची चिंता होती. थोड्याच वेळात जेव्हा माझे वडील उठून बसले. तेव्हा त्यांनी त्या व्यक्तीचे आभार मानले. या घटनेमुळे मी एवढा प्रभावित झालो की, त्यानंतर कोणत्याही व्यक्तीची मदत करणे आपला धर्म मानला. शेवटी म झ्यासाठी ही गोष्ट कोणतेच बंधन ठेवत नाही की, कोणी व्यक्ती उच्च जातीचा आहे की, खालच्या जातीचा आहे. छोटा असो व मोठा मी सर्वांना समान समजतो. आणि त्यांची समान भावानेच सेवा करतो.

## उपदेशकथा

### शहरी आणि खेडवळ

एका शेतातल्या उंदराने शहरवासी मित्राला आपल्या घरी जेवायला बोलविले. शहरी मित्राने कुतूहलाने ते आमंत्रण स्वीकारले पण जेवणाचे पदार्थ म्हणजे नुसती धान्येच होती. ते पाहून शहरी उंदीर म्हणाला, 'मित्रा, तू अगदी साध्या किड्यामुंगीसारखा जगतोस असं दिसतं. तू आता माझ्याबरोबर शहराकडे चल. तिथं सगळे चांगले पदार्थ आहेत. आपण दोघं मिळून ते खात जाऊ.' त्याप्रमाणे ताबडतोब ते दोघे शहरात गेले. शहरी उंदराने त्या खेडवळ उंदराला पाव, खवा, सुकामेवा, शेंगा, साखर आणि फळफळावळ दाखविली. ते पाहून खेडवळ उंदीर अगदी दीपून गेला. त्याने आपल्या मित्राच्या भाग्याची स्तुती केली आणि स्वत:च्या कमनशिबाबद्दल त्याला वाईट वाटले. ते जेवायला सुरुवात करणार इतक्यात दार वाजले. त्याबरोबर ते दोन छोटे जीव इतके घाबरले की ते एका फटीत लपले. जरा वेळाने ते परत सुक्या मेव्याला तोंड लावणार तोच पुन्हा दुसरे कोणीतरी त्या खोलीत आले आणि पुन्हा ते दोघेजण जीव घेऊन आपल्या बिळात शिरले. मग मात्र उपाशी राहावे लागले तरी चालेल पण आपलंच घर बरं असा त्या खेडवळ उंदराने निश्चय केला. 'राम राम मित्रा!' तो उसासा टाकून म्हणाला, 'मला आपलं माझं ते कच्चं धान्यच बरं वाटतं.

कथा उपदेश : भीतीयुक्त श्रीमंती जीवनापेक्षा शांततामय आणि साधे गरिबी जीवन चांगले.

## पंचांग

| | |
|---|---|
| १ सप्टेंबर २०२६ | योग:वृद्धि २३:३८:१३ |
| मंगळवार | करण:बालव ०७:४२:११ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:कौलव १८:५९:५० |
| आषाढ शके | करण:तैतिल |
| संवत्– १९४८ | ३०:१२:५०+ |
| संवत्सर –पराभवनाम | सूर्य:सिंह |
| अयन– दक्षिणयन | चन्द्र:मेष०३:२३:३० |
| मास– आषाढ | हिजरी सन् – १४४८ |
| ऋतु– सौर शरद | मुस्लिम मास – रबिलावल |
| कृष्ण पक्ष | तारीख – १८ |
| तिथि:चतुर्थी ०७:४२:११ | विशेष |
| तिथि:पंचमी ३०:१२:५०+ | मंगळागौरी पूजन |
| नक्षत्र:अश्विनी | पलसिद्धस्वामी पुण्यतिथी |
| २६:४१:५३+ | – साखरखेर्डा (बुलढाणा) |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०५६

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | | | 9 | 1 | 6 | 8 | | 2 |
| | | 8 | 2 | | | | 7 | |
| 1 | 4 | | | 8 | 3 | | | 5 |
| | | | | | | 7 | | |
| | 5 | 6 | 4 | | 7 | 9 | 2 | |
| | | 3 | | | | | | |
| 3 | | | 8 | 5 | | | 6 | 7 |
| | 8 | | | | 4 | 3 | | |
| 6 | | 4 | 3 | 7 | 1 | | | 8 |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. १०५५ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | 5 | 7 | 8 | 2 | 9 | 6 | 4 | 1 |
| 8 | 2 | 9 | 6 | 1 | 4 | 7 | 5 | 3 |
| 6 | 4 | 1 | 5 | 7 | 3 | 9 | 8 | 2 |
| 9 | 6 | 5 | 3 | 8 | 2 | 1 | 7 | 4 |
| 4 | 7 | 2 | 1 | 9 | 5 | 3 | 6 | 8 |
| 1 | 3 | 8 | 7 | 4 | 6 | 2 | 9 | 5 |
| 5 | 1 | 6 | 9 | 3 | 8 | 4 | 2 | 7 |
| 2 | 9 | 3 | 4 | 5 | 7 | 8 | 1 | 6 |
| 7 | 8 | 4 | 2 | 6 | 1 | 5 | 3 | 9 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- ई.स.पू. ५५०९ – बायझेन्टाईन साम्राज्यातील समजाप्रमाणे या दिवशी सृष्टीची रचना झाली.
- १९२३– टोक्यो आणि योकोहामामध्ये भूकंप; १०६००० ठार.
- २००६ – भरत जगदेव दुसऱ्यांदा गुयानाचे राष्ट्रपती बनले.

### राष्ट्रीय

- १९५७ – त्रिपुराला राज्येचा दर्जा मिळाला.
- २००७ – भारतीय हॉकी संघाने श्रीलंकेला सातव्या अशिया चषक हॉकी स्पर्धेच्या पूल–बी सामन्यात २०–० ने पराभूत केले.
- २००८ – सरकारने वित्त सचिव डी. सुब्बा राव यांची भारतीय रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरपदी नियुक्तीची घोषणा केली.

### जन्म

- १८७५ – एडगर राइस बरोज, अमेरिकन लेखक.
- १८९६ – ए.सी. भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद, वैष्णव तत्त्वज्ञानी, हरे कृष्ण पंथाचे स्थापक.
- १९०६ – होआकिन बेलाग्वेर, डॉमिनिकन प्रजासत्ताकचा राष्ट्राध्यक्ष.
- १९२१ – माधव मंत्री, भारतीय क्रिकेट खेळाडू.
- १९२६ – अब्दुर रहमान बिश्वास, बांगलादेशचा राष्ट्राध्यक्ष.
- १९४६ – रोह मू–ह्युन, दक्षिण कोरियाचा राष्ट्राध्यक्ष.
- १९४९ – पी.ए. संगमा, भारतीय राजकारणी.
- १९५१ – डेव्हिड बेरस्टो, ईंग्लिश क्रिकेट खेळाडू.

### निधन

- १०६७ – बाल्डिन पाचवा, फ्लँडर्सचा राजा.
- ११५९ – पोप एड्रियान चौथा.
- १२५६ – कुजो योरित्सुने, जपानी शोगन.
- १५७४ – गुरु अमरदास, तिसरे शीख गुरु.

## : SMS :

Pathan ne Google se pucha - Meri biwi kahan hai? Google bola - Main sab kuch dhoond sakta hoon, maut ko mat dhoondo!

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३०.२ | २३.१ |
| अहमदनगर | २९.५ | २२ |
| अकोला | ३२ | २४ |
| अमरावती | ३१ | २४ |
| बीड | ३१.५ | २३ |
| भंडारा | ३१.८ | २४ |
| बुलढाणा | ३१.५ | २३.७ |
| चंद्रपूर | ३३ | २५.२ |
| चेन्नई | ३१.५ | २३.५ |
| नवी दिल्ली | ४६ | ३५.३ |
| धुळे | ३१.६ | २३.८ |
| गोंदिया | ३१.३ | २५.६ |
| जळगाव | ३२.३ | २४.२ |
| कोल्हापूर | २८.५ | २२ |
| लातूर | ३०.५ | २३ |
| मुंबई | २९ | २९.१ |
| नागपूर | ३१ | २४ |
| नांदेड | ३१.७ | २४.१ |
| नंदूरबार | ३१ | २४.२ |
| नाशिक | २४ | १९.३ |
| पुणे | २७.१ | २२ |
| पंढरपूर | ३४.२ | २३.५ |
| सातारा | ३०.८ | २२.५ |
| सांगली | ३१.९ | २३ |
| सोलापूर | ३४.३ | २३.७ |
| वर्धा | ३५.२ | २६.१ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:पश्चिम आत्मविश्वास कमी झाल्यामुळे मन लागणार नाही. व्यापार व्यवसाय मध्यम राहील.

**वृषभ :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा:पूर्व मनात अशांती असल्या कारणाने संकटाचा सामना करावा लागेल. जबाबदारीनुसार काम करा.

**मिथुन :** शुभ रंग:पांढरा,शुभ दिशा:पश्चिम आपल्या कामाचे प्रतिफळ ताबडतोब मिळेल. अनकूल परिस्थिती निर्माण होईल.

**कर्क :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पुर्व आपल्या पराक्रमी वृत्तीमुळे आपल्याकडे येणाऱ्या लोकांचा ओढा जास्त राहील. कोणाचाही तिरस्कार करू नका.

**सिंह :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा:उत्तर अनिश्चितता राहील. सर्व कामे मनासारखी होतील. वैयक्तीक जीवनात सावध रहा. विशेष सहकार्य व मार्गदर्शन मिळेल.

**कन्या :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा: उत्तर प्रयत्न यशस्वी होतील. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. विचार पूर्वक निर्णय घेतल्याने फायदा होईल.

**तुळ :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:दक्षिण आपल्या बुद्धीच्या जोरावर आखलेल्या योजना यशस्वी होतील.

**वृश्चिक :** शुभ रंग: लाल, शुभ दिशा:पूर्व प्रभावशाली व्यक्तित्वामुळे आपल्या गोष्टी लोकांपर्यंत पोहचविण्यात यशस्वी व्हाल.


**धनु :** शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा:पूर्व प्रत्येक क्षेत्रात आपल्याला मान सन्मान मिळेल. शांत व विवेक बुद्धीने काम केल्यास यश मिळेल.

**मकर :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा:पूर्व कार्य क्षमतेमध्ये वाढ होईल. धार्मिकतेकडे मन झुकेल. अपूर्ण राहिलेले काम वेळेत पूर्ण होण्याचे योग आहेत.

**कुंभ :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा:पुर्व उतावीळपणामुळे नुकसान होण्याची शक्यता. कामात झालेल्या बदलामुळे कष्ट होण्याची शक्यता.

**मीन :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:उत्तर व्यापारात नुकसान होण्याचे योग आहेत. घरातील वृध्द व्यक्तिंच्या आरोग्याची काळजी घ्या. अडकलेला पैसा मिळेल.

## 'दैं. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०५६



### आडवे शब्द

१. रावसाहेब रामराव – अर्थात गृहमंत्री आबांचे नाव
६. पोलिसांवरील अधिकारी
९. ही धरून लगडी घालतात
११. छिद्र, जखम
१२. जय पराजय
१४. घोंगड्या विणणारी जमात
१६. मोठा हातोडा
१७. रम्य दृश्य
१९. धमनी
२१. मला
२४. उपहास
२५. शरीर
२७. खरकट्याचा ढीग
२९. श्रीकृष्णाचे एक नाव
३१. वचक, भीती
३२. हिंदीत शरीर
३३. बारीक झिणझिण
३५. वाक्बगार
३७. अभिमन्यूला ठार मारणारा
३९. फायदा
४०. दहा अब्ज ही संख्या
४१. लाज
४३. रसाळ
४५. मूळ अर्थ शहाणा, सुंदर आणि प्रचलित अर्थ शहरी
४६. जाणे–येणे, वहिवाट
४८. पायताण
४९. सीतेची जुळी मुले
५१. खदक
४३. '––– रे झूठ मत बोलो, खुदा के पास जान है'
५४. पौराणिक आयुध
५५. ओझी उचलणारा
५७. सत्त्व
५९. जोखीम
६१. वाई–महाबळेश्वरमधील प्रसिद्ध घाट
६२. पोहणे
६४. गवताचे रुंद पान
६५. निवासस्थान
६६. मत देणारा
६८. उत्पन्नातील सरकारी हिस्सा
६९. भित्रा, पळ काढणारा
७०. कुलीन
७२. जाणकार
७५. पालव
७७. ढीग
७९. रक्तवाहिन्या
८०. जमीनदार
८१. कमीतकमी, निदान एवढे तरी!

### उभे शब्द

१. संरक्षण
२. बाहेरच्या विरूद्ध
४. धरणातील पाणीसाठ्याचा प्रदेश
५. छोटी
६. सैनिक
७. जपणे
८. आवड
९. घट्ट, तणावाची स्थिती
१०. उष्ण
१३. प्रजा
१५. दृष्टीभेट
१६. गर्द, गच्च
१८. वेगाने
२०. शीतपेय
२२. सोनिया गांधी यांचे दिल्लीतील निवासस्थान या मार्गावर आहे
२३. खरे तर हे काही जेवण नव्हे!
२६. सापाला कधी धाकला म्हणू नये आणि याला आपला!
२८. माज
३०. आवाज, गोंगाट
३४. डोळ्यात तेल घालून करण्याचे काम
३५. विनाश
३६. राजालाही इथे नतमस्तक व्हावे लागते
३८. मृत्यूचा राजा
४१. संभवनीय
४२. पारशी जनतेचा वर्षारंभ दिन
४४. नूतन
४७. माळी, बागवान
५०. काढलेली खोडी
५२. जाडसर पीठ
५३. सर्व
५४. मारुती, भीम
५५. हिंदुस्थानी
५६. उपस्थित
५८. उत्सवाचे दिवस
६०. च्या बद्दल
६३. तरतूद
६४. साडी
६५. जात्याचा आवाज
६६. मधुमक्षिका
६७. शील, उदारता
६८. गव्हाचे बारीक पीठ
६९. पुन्हा
७१. नवरा
७३. नवरत्नांपैकी एक
७४. खेडे
७६. फितुरी
७७. भूपती
७८. माळ, हार

### जम्बो शब्दकोडे क्र. १०५५ चे उत्तर

आडवे उत्तर
१.कावेबाज ४.सपाट ७.सदाशिव १०.नगर ११.वादळ १२.कलाकार १३.वरद १५.वादावादी १७.पार १८.बकरा २०.अननस २१.कटकट २३.अंतराळ २४.रुपाया २६.सोंग २७.धन २८.शरद ३०.लसलस ३२.डर ३३.यक्ष ३४.भाट ३६.खास ३८.मध ३९.कडक ४१.गदगदणे ४३.नयनबाण ४५.वारी ४६.जर ४७.कद ४८.मखर ५०.बाकदार ५२.तलशीलवार ५४.कल ५५.अळी ५६.सट ५८.बत्तासा ५९.पनवती ६२.सहकार्य ६३.सत्ता ६४.तयारी ६५.पगारदार ६७.ससा ६८.क्षमावंत ७०.कम ७१.दादला ७२.भाक ७३.टारगट ७६.मग्रूर ७७.परावलंबन

उभे उत्तर : १.कान २.वेगवान ३.बारदान ४.साद ५.पळवाट ६.कोलार ७.सरबत ८.शिवराळ ९.वर ११.वादी १२.कपाट १४.दशानन १६.वासरू १९.करामत २०.अतिशय २१.कयास २२.कळस २३.अंगरखा २५.पालट २६.सोंड २७.धबधबा २९.रक्षक ३१.लवाद ३४.भाकर ३५.उदर ३७.सनदशीर ३८.मन ४०.डगर ४१.नर्तक ४२.गजर ४४.धमक ४७.कप ४९.खलबत्ता ५०.बाळी ५१.दाटून ५२.तट ५३.वार्ताहर ५५.असातसा ५६.सती ५७.कार्यक्रम ५९.परीक्षक ६०.वरवंटा ६१.धागा ६२.सदा ६३.सरदार ६६.रक्षा ६७.सलाम ६९.तरट ७०.कदंब ७२.भार ७४.टप ७५.भाव

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे



### खेड शिवापूर परिसरातील रस्त्यांची दुरावस्था नागरिक त्रस्त

**खेड शिवापूर : दैनिक संध्या**

सासवड वरून गराडे मरीआई घाट मार्गे खेड शिवापूर कडे जातात कासुर्डी परिसरात रस्त्याची दुरावस्था झाली आहे. त्यामुळे नागरिकांना व परिसरातील उद्योग व्यावसायिकांना त्रास सहन करावा लागत आहे. चाकण परिसरातील उद्योग व्यावसायिकांना आवश्यक भौतिक सुविधा न पुरवल्याने उद्योगांचे स्थलांतर होत आहे ही गोष्ट लक्षात घेऊन कासुर्डी खेड शिवापूर परिसरातील उद्योगांना आवश्यक सुविधा पुरवण्यासाठी तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. या परिसरातून सासवडकडे येण्यासाठी सोयीचा मार्ग असल्याने या भागातून वाहतूकही लक्षणीय वाढलेली आहे. या भागात ग्रामपंचायतीच्या माध्यमातून काँक्रिटीकरण करण्यात आलेले आहे. मात्र ते सरसकट न झाल्याने काही भागात चांगला रस्ता तर काही भागात सततच्या पावसामुळे निसरडा झालेला रस्ता अशी अवस्था आहे. शासकीय यंत्रणांनी तातडीने या भागात पाहणी करून पावसाळा संपेपर्यंत तात्पुरत्या उपाययोजना करून नागरिकांना दिलासा द्यावा, पावसाळ्यानंतर कायमस्वरूपी उपाय योजना करून रस्त्याची डागडुजी, दुरुस्ती करावी अशी मागणी या परिसरातील नागरिकांनी केली आहे.

### पंतप्रधान अन् आठवले साहेबांमुळे सामाजिक न्यायाला खरी दिशा : डॉ. हुलगेश चलवादी

**पुणे : दैनिक संध्या**

■ निधीचा पारदर्शक वापर, डीबीटी , नियमित देखरेखीमुळे लाभार्थ्यांपर्यंत योजनांचा थेट लाभ

कल्याणकारी योजनांचा निधी योग्य लाभार्थ्यांपर्यंत पोहोचणे हीच सामाजिक न्यायाची खरी दिशा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले साहेबांच्या विशेष प्रयत्नांमुळे हे सर्व शक्य होत असल्याचे मत आरपीआय (ए) चे प्रदेश उपाध्यक्ष डॉ.हुलगेश चलवादी यांनी सोमवारी (ता.३१) व्यक्त केले. अनुसूचित जातीच्या शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक सक्षमीकरणासाठी केंद्र सरकारकडून राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीवर सातत्याने देखरेख ठेवण्यात येत असून, योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत वेळेत पोहोचविण्यासाठी डिजिटल यंत्रणा आणि थेट लाभ हस्तांतरणावर विशेष भर दिला जातोय, हे विशेष. अनुसूचित जातींसाठीच्या पोस्ट-मॅट्रिक शिष्यवृत्तीला २०२५-२६ मध्ये ६,३६० कोटी, प्रधानमंत्री अनुसूचित जाती अभ्युदय योजना (PM-AJAY) साठी २,१४० कोटी, तर SHREYAS अंतर्गत विविध शैक्षणिक योजनांसाठी ४७२ कोटींची तरतूद सरकारने केली आहे. PM-AJAY अंतर्गत २०२१-२२ पासून आतापर्यंत हजारो गावांच्या विकासाला चालना मिळाली असून, २०२६ मध्ये १७,०६७ गावे आदर्श ग्राम म्हणून घोषित झाली आहेत. या गावांमधील २.६५ लाखांहून अधिक लाभार्थ्यांना शिक्षण क्षेत्रात लाभ मिळाला आहे. तसेच २०२१-२२ ते २०२५-२६ या कालावधीत अनुसूचित जाती विद्यार्थ्यांसाठी ९० वसतिगृहे मंजूर करण्यात आली असून, त्याचा १०,६४९ विद्यार्थ्यांना लाभ झाला असल्याचे डॉ.चलवादी म्हणाले. निधीच्या वापराचे नियमित पुनरावलोकन, सामाजिक लेखापरीक्षण, डिजिटल निधी व्यवस्थापन आणि डीबीटी यामुळे पारदर्शकता वाढत आहे. केंद्र व राज्यांच्या समन्वयातून योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावी करून अनुसूचित जाती समाजाच्या शिक्षण, रोजगार आणि सामाजिक-आर्थिक सक्षमीकरणाला नवी गती मिळतेय, असे मत डॉ.चलवादी यांनी व्यक्त केले.



### आराधना महोत्सवानिमित्त काढलेल्या महा रथयात्रेत हजारो भक्त सहभागी

**पुणे : दैनिक संध्या**

विविधरंगी पाना फुलांनी सजविलेला रथ, रथामध्ये श्री राघवेंद्र स्वामी यांची चांदीची मूर्ती, धूप आरतीचा सुगंध, पवित्र मंत्रोच्चार ,पारंपारिक वादन गुलालांची उधळण आणि नक्षीदार रांगोळ्यांच्या पायघड्या अशा धार्मिक आणि अध्यात्मिक वातावरणात श्री राघवेंद्र स्वामींच्या 355 व्या आराधना महोत्सवानिमित्त भव्य महा रथयात्रा काढण्यात आली. हजारोच्या संख्येने सहभागी झालेल्या भक्तांचे जयघोष आणि मंत्रोच्चार यांनी या महायात्रेने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले. श्री राघवेंद्र स्वामींच्या ३५५व्या आराधना महोत्सवाचे आयोजन श्री सदाशिव पेठेतील वरदेंद्र श्री राघवेंद्र स्वामी मठ येथे २९ ते ३१ ऑगस्ट २०२६ या कालावधीत करण्यात आले . यानिमित्त लक्ष्मी रोडवरील राघवेंद्र स्वामी मठ येथून महारथयात्रा काढण्यात आली . शेकडोंच्या संख्येने भाविक या रथयात्रेमध्ये सहभागी झाले होते . नगरकर चौघडा वादन महारथ यात्रेच्या अग्रस्थानी होते त्यानंतर श्रीकृष्ण बँड वर लावण्यात आलेल्या विविध धार्मिक गीतांनी महारथ यात्रेचे वातावरण प्रफुल्लित झाले होते. पारंपारिक वस्त्र परिधान करून महा रथयात्रेमध्ये सहभागी झालेले भक्त गुलालांची उधळण करत श्री राघवेंद्र स्वामी यांचा जयघोष आणि मंत्रोच्चार करत होते. त्यामुळे लक्ष्मी रोडवरील वातावरण भक्तीमय झाले होते. जगद्गुरु श्रीमन्मध्वाचार्य मूळ महासंस्थानम्, नंजनगुडू यांच्या वतीने तसेच मठाच्या मार्गदर्शनाखाली हा धार्मिक सोहळा पार पडला.महोत्सवाच्या निमित्ताने ध्वजारोहण, प्राणप्रतिष्ठा, शाकोत्सव, धनधान्य पूजा व लक्ष्मी पूजा आधी धार्मिक विधी करण्यात आले . तसेच उपाकर्म कार्यक्रमांतर्गत ऋग्वेदीय उपाकर्म , यजुर्वेदीय उपाकर्म करण्यात आले. महारथ यात्रेच्या निमित्ताने राघवेंद्र स्वामी मठाचे व्यवस्थापक श्री दत्तात्रय जोशी गुरुजी म्हणाले भारतरत्न भीमसेन जोशी गानसम्राज्ञ किशोरी आमोणकर रघुनंदन पंशिकर हे कलाकार राघवेंद्र स्वामी यांचे भक्त आहेत त्यांनी संगीताच्या स्वरूपामध्ये राघवेंद्र स्वामी यांची सेवा केली आहे आंध्र प्रदेश तामिळनाडू आणि कर्नाटक प्रमाणेच महाराष्ट्र मध्ये ही श्री राघवेंद्र स्वामी यांचे शिष्यगण वाढत आहेत पुण्यामध्ये अडीचशे वर्षांपासून हा मठ आहे. श्री राघवेंद्र स्वामी यांची शिकवण सर्व दूर पसरावे यासाठी या महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. आराधना महोत्सवाच्या तीन दिवसांत विविध धार्मिक सेवांचे आयोजन करण्यात आले. सुप्रभात सेवा , पंचामृत अभिषेक , उत्सवाराय पाद्यपूजा व कनकमहा पूजा , त्यानंतर अलंकार, हस्तोदक, महामंगलारती व तीर्थप्रसाद आधी धार्मिक कार्यक्रम झाले. सायंकाळी महोत्सवाच्या शेवटच्या दिवशी ५ स्वस्तिवाचन, डोलोत्सव व महामंगलारती करण्यात आली .महोत्सवात सांस्कृतिक कार्यक्रमांनाही विशेष स्थान देण्यात आले. आनंद भीमसेन जोशी आणि कुमारी सुजाता देवन यांचा दासवाणी कार्यक्रम झाले.

# २१ विधानसभा मतदारसंघांची प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध

■ पुणे (दै. संध्या)

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार दि. १ ऑक्टोबर २०२६ या अर्हता दिनांकावर आधारित मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत पुणे जिल्ह्यातील सर्व २१ विधानसभा मतदारसंघांची प्रारूप मतदार यादी आज, दि. ३१ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या उपस्थितीत प्रसिद्ध करण्यात आली आहे.

यावेळी उप जिल्हा निवडणूक अधिकारी मिनल कळसकर, तहसीलदार शीतल मुळे तसेच राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते. पुणे जिल्ह्यात विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी ९० लाख ८० हजार १७३ मतदारांची नोंद होती. या कार्यक्रमांतर्गत तयार करण्यात आलेल्या प्रारूप मतदार यादीनुसार ६२ लाख १३ हजार ६९२ इतके मतदार नोंदणी झाली आहे. यामध्ये ३१ लाख ५१ हजार २९७ पुरुष तर ३० लाख ६२ हजार १२ महिला व ३८३ तृतीयपंथी मतदार नोंदणी झाली आहे. मतदान केंद्रांमध्ये ७ ने वाढ होऊन आता ८ हजार ४२४ मतदान केंद्र झाली आहेत. यामध्ये जुन्नर ३५६ आंबेगाव ३४४ खेड आळंदी ३९३ शिरूर ४५९ दौंड ३१५ इंदापूर ३३९ बारामती ३८८ पुरंदर ४१३ भोर ५६७ मावळ ४०२ चिंचवड ५६० पिंपरी ३९७ भोसरी ४९१ वडगाव शेरी ४३८ शिवाजीनगर २६६ कोथरूड ३८७ खडकवासला ५०२ पर्वती ३४४ हडपसर ५२५ पुणे कॅन्टोन्मेंट २७० कसबा पेठ २६८ असे एकूण ८ हजार ४२४ मतदान केंद्रांचा समावेश आहे. एएसडीडी यादीनुसार २८ लाख ६६ हजार ४८१ गणना अर्ज अनकलेक्टटेबल मतदार आहेत. त्यातील एक लाख ४३ हजार ९७५ दुबार, ३ लाख १२ हजार ४८ मयत, १७ लाख ८३ हजार ५८ अनुपस्थित, ५ लाख ९१ हजार ३८ स्थलांतरित व ३६ हजार ३६२ इतर मतदार आहेत.



दरम्यान, प्रारूप मतदार यादीवर दावे व हरकती दाखल करण्यासाठी दि. ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२६ हा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. या कालावधीत संबंधित मतदार नोंदणी अधिकाऱ्यांकडे दावे व हरकती सादर करता येतील. दावे व हरकतींवर दि. ३१ ऑगस्ट ते २९ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत कार्यवाही करण्यात येणार असून, अंतिम मतदार यादी दि. ४ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. पुणे जिल्ह्यातील सर्व २१ विधानसभा मतदारसंघांची प्रारूप मतदार यादी संबंधित मतदार नोंदणी अधिकाऱ्यांची कार्यालये, जिल्हाधिकारी कार्यालय तसेच मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या जिल्हाध्यक्षांच्या कार्यालयात उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच पुणे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या pune.gov.in संकेतस्थळावर ही यादी पाहता येणार आहे. याशिवाय, प्रारूप मतदार यादी भारत निवडणूक आयोगाच्या ECINET आणि Voter Service Portal वरही उपलब्ध करून देण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हा प्रशासनाने कळविली आहे.

प्रारूप मतदार यादीतील ६२ लाख ११ हजार ९५० मतदारांपैकी ५ लाख ७७ हजार ८२१ विसंगती तर ७ लाख ५४ हजार ५९७ मॅपिंग न झालेले अशा एकूण १३ लाख ३२ हजार ४१८ सुनावण्या होतील.

या यादीमध्ये नाव नसल्यास प्रपत्र क्रमांक ६ भरुन नव्याने मतदार नोंदणी करावी. तसेच यादी नावामध्ये आक्षेप असल्यास प्रपत्र क्रमांक ७ भरुन आक्षेप नोंदविता येणार आहे. ईपीक कार्ड करिता प्रपत्र क्रमांक ८ भरता येईल आणि मतदार यादीमध्ये दुरुस्ती देखील करुन घेता येईल.

प्रारूप मतदार यादीमध्ये समाविष्ट मतदारांच्या तपशिलात तफावत आढळल्यास तसेच २००२ च्या मतदार यादीशी ज्यांचे मॅपिंग झालेले नाही (No Linkage), अशा मतदारांसाठी संबंधित यादी भागाच्या सहायक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांच्या स्तरावर सुनावणी घेण्यात येणार आहे. सुनावणीनंतर संबंधित मतदाराचे नाव अंतिम मतदार यादीत समाविष्ट करायचे किंवा नाही, याबाबत निर्णय घेतला जाणार आहे.

## १०० युवकांना कौशल्य प्रशिक्षण; ८६ जणांना रोजगार

■ पुणे (दै. संध्या)

उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेने ‘वाय४डी फाउंडेशन’च्या भागीदारीत राबविलेल्या ‘स्किल टू एम्प्लॉयबिलिटी’ या उपक्रमातून १०० बेरोजगार युवकांना उद्योगाभिमुख कौशल्य प्रशिक्षण देण्यात आले असून, त्यापैकी ८६ युवकांना आतापर्यंत रोजगाराच्या संधी मिळाल्या आहेत. बँकेच्या सामाजिक दायित्वांतर्गत (सीएसआर) राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचा उद्देश युवकांना आवश्यक कौशल्ये देऊन त्यांच्यासाठी शाश्वत रोजगाराच्या संधी निर्माण करणे हा आहे. या उपक्रमांतर्गत प्रशिक्षण पूर्ण केलेल्या युवकांचा त्यांच्या यशाबद्दल सत्कार करण्यात आला. भोर येथील कौशल्य प्रशिक्षण केंद्रात हे प्रशिक्षण देण्यात येत असून, प्रशिक्षणानंतर युवकांना भोर आणि शिरवळ परिसरातील औद्योगिक क्षेत्रातील विविध कंपन्यांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येत आहेत. दोन महिन्यांच्या या प्रशिक्षण कार्यक्रमात मुद्रित सर्किट मंडळ (पीसीबी) जोडणी ऑपरेटर तसेच वाहन उद्योगातील जोडणी ऑपरेटर या पदांसाठी आवश्यक तांत्रिक कौशल्ये विकसित केली जात आहेत. राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळाच्या (एनएसडीसी) मान्यताप्राप्त तांत्रिक प्रशिक्षणासोबत प्रत्यक्ष कामाचा अनुभव, कार्यस्थळावरील आवश्यक कौशल्ये आणि संवाद व व्यक्तिमत्त्व विकासासारख्या सॉफ्ट स्किल्सचे प्रशिक्षणही दिले जात आहे. यावेळी उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मार्टिन पॅम्पिली एस. म्हणाले, “योग्य कौशल्यांपर्यंत पोहोच उपलब्ध करून दिल्यास शाश्वत रोजगाराच्या संधी निर्माण होऊ शकतात, या विश्वासातून ‘स्किल टू एम्प्लॉयबिलिटी’ उपक्रम राबविण्यात आला आहे. वंचित घटकांतील अनेक युवक आपल्या कुटुंबातील औपचारिक क्षेत्रात रोजगार मिळविणारे पहिले सदस्य आहेत. त्यामुळे हे प्रशिक्षण त्यांच्यासाठी केवळ प्रमाणपत्र मिळविण्यापुरते मर्यादित नसून, आर्थिक स्वावलंबन आणि सन्मानाने जगण्याच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे. भोर आणि शिरवळ परिसरातील अधिकाधिक युवकांना रोजगारक्षम बनविण्यासाठी आम्ही अशा उपक्रमांचा विस्तार करण्यास कटिबद्ध आहोत.” या उपक्रमातील बहुतांश लाभार्थी वंचित आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील आहेत. अनेक युवक पहिल्यांदाच औपचारिक रोजगाराच्या क्षेत्रात प्रवेश करत असल्याने त्यांच्या कुटुंबांच्या उत्पन्नाला स्थैर्य मिळण्यास मदत होत आहे.

## लिटमॉसने पुण्यात नवीन कार्यालयाचे केले उद्घाटन

■ पुणे (दै. संध्या)

जागतिक लर्निंग ॲक्सीलरेशन प्लॅटफॉर्म असलेल्या लिटमॉसने पुण्यात आपले नवीन कार्यालय परख हाऊस, ६ वा मजला, बोट क्लब रोड, बंड गार्डन, संगमवाडी, पुणे – ४११००१ येथे सुरू करून एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. लिटमॉस एआय युगात १५० देशांमधील ११,००० हून अधिक संस्थांना त्यांचे कार्यबल, भागीदार आणि ग्राहकांमध्ये मानवी क्षमता निर्माण करण्यास मदत करते. हे नवीन स्थान भारतामध्ये एक मजबूत अभियांत्रिकी समुदाय निर्माण करण्याच्या दृष्टीने एक धोरणात्मक गुंतवणूक आहे. ती जगभरातील विद्यमान डेव्हलपर कार्यक्रमाला पूरक असून लिटमॉसच्या जागतिक तंत्रज्ञान क्षमतांचा विस्तार करणारी आहे.



पुण्यातील कार्यालयाचे हे उद्घाटन म्हणजे लिटमॉसमधील लक्षणीय वाढ आणि नावीन्यपूर्णतेच्या कालखंडाचा एक विस्तार आहे. त्याच्या उत्पादनांमधील सुधारणा, नवीन कार्यकारी नेमणुका आणि नवीन भागीदारी यांचा त्यात समावेश आहे. एक अग्रगण्य लर्निंग ॲक्सीलसरेशन प्लॅटफॉर्म म्हणून लिटमॉस आपले स्थान मजबूत करीत असून ती संस्थांना त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांपेक्षा वेगाने नवीन मानवी क्षमता शिकण्यास, जुळवून घेण्यास आणि कार्यान्वित करण्यास मदत करत आहे.

लिटमॉसचे मुख्य कार्यकारी अधिकारी एरिक व्हर्मिलियन, लिटमॉसचे सीटीओ ब्रायन सोबस आणि इंडिया ऑपरेशन्सचे संचालक सरबजीत सिंग यांच्या उपस्थितीत फीत कापून या कार्यालयाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले.

लिटमॉसचे मुख्य कार्यकारी अधिकारी एरिक व्हर्मिलियन म्हणाले, “पुण्यातील आमच्या कार्यालयाची सुरुवात ही लिटमॉसच्या लोक, तंत्रज्ञान आणि जागतिक क्षमतांमध्ये सतत गुंतवणूक करण्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचा टप्पा आहे. भारताकडे जगातील सर्वात सखोल आणि सर्वाधिक कुशल तंत्रज्ञान प्रतिभा आहे. इथे असाधारण अभियांत्रिकी कौशल्य, मजबूत शैक्षणिक पाया आणि जागतिक स्तरावरील जटिल आव्हाने सोडवण्याचा अनुभव आहे. विशेषतः पुण्यात अनुभवी व्यावसायिक आणि उदयोन्मुख प्रतिभा यांचा अपार साठा असल्यामुळे एक उत्साही तंत्रज्ञान परिसंस्था तयार झाली आहे.


भारतामुळे आमच्या विद्यमान जागतिक अभियांत्रिकी प्रतिभेमध्ये सखोल अनुभवाची भर पडत असून या नवीन अध्यायामुळे निर्माण होणाऱ्या या शक्यतांबद्दल आम्ही उत्सुक आहोत." लिटमॉसच्या इंडिया ऑपरेशन्सचे संचालक सरबजीत सिंग म्हणाले, "या नवीन कार्यालयामुळे लिटमॉसला एकाच ठिकाणी एकत्र राहण्याचे खरे फायदे समजण्यास मदत होईल.

यामध्ये स्वाभाविकपणे घडणारे मार्गदर्शन आणि ज्ञानाचे आदानप्रदान तसेच दूरून साध्य करता येणे अवघड असलेले शिक्षण आणि सहयोग यांचा समावेश आहे. पुण्यातील टीम स्वतःचे कौशल्य वाढवत असताना आणि लिटमॉसच्या जागतिक यशात योगदान देण्याची संधी प्राप्त करत असताना तिला पाठिंबा देण्याची ही संधी मिळाल्याबद्दल मी विशेष आनंदी आहे."

## फोनपेकडून भारतातील फिचर फोन युजर्ससाठी यूपीआय पेमेंट सुविधा लाँच

■ पुणे (दै. संध्या)

फोनपे ने आज फोनपे यूपीआय १२३पे लाँच करण्याची घोषणा केली आहे, ज्यामुळे संपूर्ण भारतातील फिचर फोन युजर्सना इंटरनेट कनेक्शनची गरज नसतानाही यूपीआय पेमेंट क्षमता उपलब्ध झाली आहे. यासोबतच, फोनपे ही भारतातील 20 कोटींहून पेक्षा जास्त फिचर फोन युजर्सपर्यंत यूपीआय पेमेंट्सचा विस्तार करणारी पहिली प्रमुख थर्ड-पार्टी ॲप्लिकेशन प्रोव्हायडर ठरली आहे. आर्थिक समावेशन वाढवण्यासाठी आणि वंचित घटकांना डिजिटल पेमेंट्सच्या प्रवाहात आणण्यासाठी हे एक अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे. नोकिया, एचएमडी, आयटेल आणि लावा इंटरनॅशनलच्या फोन्सवर ही सेवा आधीपासूनच इन-बिल्ट मिळणार असून, येत्या काही महिन्यांत इतर मोबाईल कंपन्यांशीही भागीदारी केली जाईल. साध्या (फिचर) फोन्सवर सहज यूपीआय पेमेंट्स करता यावेत, यासाठी आम्ही खास स्वतःचे स्वतंत्र तंत्रज्ञान तयार केले आहे आणि ही लाँचिंग त्याच तंत्रज्ञानावर आधारित आहे. फोनपे ने आज फोनपे यूपीआय १२३पे हे अतिशय विश्वासू आहे आणि ते मजबूत एसएमएस सिस्टीमवर काम करते. यामुळे अगदी कमी २जी नेटवर्क असलेल्या भागातही तुमचे व्यवहार सहज आणि यशस्वीपणे पूर्ण होतात. या प्लॅटफॉर्मवरून तुम्ही मोबाईल नंबर किंवा यूपीआय आयडी वापरून एकमेकांना सहजरीत्या पैसे पाठवू शकता. तसेच यूपीआय आयडी आणि क्यूआर कोड स्कॅन करून व्यापाऱ्यांनाही पेमेंट करू शकता. पैसे पाठवण्याव्यतिरिक्त, फिचर फोनचे युजर्स आपले बँक खाते मॅनेज करू शकतात, बँक बॅलन्स तपासू शकतात आणि व्यवहारांचा इतिहास पाहू शकतात. येणाऱ्या नवीन अपडेट्समध्ये फिचर फोनवर आधी उपलब्ध नसलेली नवीन आणि प्रगत फिचर सादर केली जातील; ज्यामध्ये बिल पेमेंट, रिचार्ज आणि यूपीआय वर आधारद्वारे अकाऊंट सुरू करणे (आधार-आधारित ऑनबोर्डिंग) या सोयींचा समावेश असेल. यासोबतच, फिचर फोन युजर्सना यूपीआय सुरू करताना मदत व्हावी म्हणून फोनपेने एक खास एआय व्हॉईस हेल्पलाइन सुरू केली आहे.




## संतोष जगताप यांना औद्योगिक अभियांत्रिकी सुरक्षा क्षेत्रात डॉक्टरेट मिळाल्याबद्दल सत्कार

■ पुणे (दै. संध्या)

नॅशनल सेफ्टी ऑर्गनायझेशनचे माजी विद्यार्थी आणि गोदरेज प्रॉपर्टीज लिमिटेडचे जनरल मॅनेजर संतोष जगताप यांना जी. डी गोएंका युनिव्हर्सिटी कडून औद्योगिक क्षेत्रातील अत्यंत महत्त्वपूर्ण अशा अभियांत्रिकी सुरक्षा क्षेत्रात डॉक्टरेट मिळविल्याबद्दल नॅशनल सेफ्टी ऑर्गनायझेशनच्या देशविदेशातील सुरक्षा अधिकाऱ्यांच्या संमेलनात संस्थेचे माजी अध्यक्ष डॉ. दिलीप देशपांडे यांचे हस्ते शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विद्यमान अध्यक्ष क्षीरसागर, डॉ.अमित पाटील, अमोल काशीद तसेच देशविदेशातील विविध औद्योगिक क्षेत्रातील सुरक्षा अधिकारी उपस्थित होते. डॉ. दिलीप देशपांडे यांनी संस्थेच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त करून कारखान्यात कायदा व सुरक्षा व्यवस्था अंमलात आणत असतांना कामगारांचे मत विचारात घेऊन कायदे राबविल्यास कामगारांचे संपूर्ण सहकार्य मिळते व अपघात टाळण्यास मदत होते असे सांगितले. सत्काराला उत्तर देतांना संतोष जगताप यांनी आपल्या यशाचे श्रेय संस्थेचे व आपल्या गुरूजनांचे असून सुरक्षेबाबत अजून खूप कांही शिकायचे आहे व अनेक कर्तबगार सुरक्षा अधिकारी निर्माण करायचे आहेत असे प्रतिपादन केले.



# येरवडा खुले कारागृहात राखी बांधताना कैदी बांधवांच्या आसवांनी भिजले स्नेहाचे धागे

### अनाहिता कपूर फाउंडेशनतर्फे विशेष रक्षाबंधन सोहळा; बंदी बांधवांसाठी वैद्यकीय, शैक्षणिक व कायदेशीर मदतीची घोषणा

■ पुणे (दै. संध्या)

येरवडा खुले कारागृहातील वातावरण रक्षाबंधनाच्या दिवशी भावूक झाले. अनाहिता कपूर फाउंडेशन आणि येरवडा खुले कारागृह यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या विशेष रक्षाबंधन सोहळ्यात २५ महिला भगिनींनी कारागृहातील बंदी बांधवांना राखी बांधून औक्षण केले. अनेक दिवसांनंतर मनगटावर सजलेला रेशमाचा पवित्र धागा आणि बहिणीच्या मायेचा स्पर्श अनुभवताना अनेक बंदी बांधवांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. स्नेह, माया आणि आपुलकीच्या या क्षणांनी उपस्थितांचेही मन हेलावून गेले.



“जगातील सर्व सुखे तुला मिळोत आणि आयुष्यात दुःखाची सावलीही न येवो,” या भावनेने भगिनींनी आपल्या भावांच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना केली. तर बंदी बांधवांनीही या अनमोल नात्याचा बंध आयुष्यभर हृदयात जपण्याचा संकल्प व्यक्त केला. महाराष्ट्र कारागृह व सुधारसेवा विभागातर्फे १ सप्टेंबर हा दिवस ‘कारागृह ध्वज दिन’ म्हणून राज्यभरातील कारागृहांमध्ये उत्साहात साजरा केला जातो. याच पार्श्वभूमीवर येरवडा खुले कारागृहात दि. २७ ऑगस्ट ते १ सप्टेंबर २०२६ या कालावधीत ‘ध्वज सप्ताह’ आयोजित करण्यात आला आहे. या सप्ताहाच्या सहाव्या दिवशी रक्षाबंधनाचा विशेष कार्यक्रम घेण्यात आला. महाराष्ट्र राज्याचे अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक डॉ. सुहास वारके, विशेष कारागृह महानिरीक्षक योगेश देसाई आणि पुणे विभागाचे कारागृह उपमहानिरीक्षक सुनील ढमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. यावेळी कारागृह अधीक्षक शामकांत शेडगे यांनी बंदी बांधवांच्या सुधारणा व पुनर्वसनासाठी येरवडा खुले कारागृहात राबविण्यात येत असलेल्या १६ विविध समाजोपयोगी उपक्रमांची माहिती दिली. “येथे असलेले बंदी हे केवळ कैदी नसून आमचे बांधव आणि परिवार आहेत. त्यांच्या भविष्यातील चांगल्या जीवनासाठी प्रशासन सातत्याने प्रयत्नशील आहे,” असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख पाहुणे सुहासदादा टिंगरे, रविदादा टिंगरे, हसीना इनामदार, नितीन ढवाणे, निलेश निकम, बाबासाहेब पाटील, अनाहिता कपूर आणि शामकांत शेडगे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुण्यांचा शाल, ट्रॉफी व रोप देऊन सत्कार करण्यात आला.

## थोडक्यात पण महत्वाचे



### दीपा ज्वेलर्सचा आयपीओ आज खुला होणार

**मुंबई : दैनिक संध्या**

दीपा ज्वेलर्स लिमिटेडचा प्रारंभिक सार्वजनिक समभाग विक्री प्रस्ताव अर्थात आयपीओ मंगळवार, १ सप्टेंबर २०२६ रोजी खुला होणार असून, गुरुवार, ३ सप्टेंबर रोजी बंद होणार आहे. कंपनीने दोन रुपये दर्शनी मूल्य असलेल्या प्रत्येक इक्विटी शेअरसाठी १६८ ते १७७ रुपये असा किंमत पट्टा निश्चित केला आहे. गुंतवणूकदारांना किमान ८४ इक्विटी शेअर्ससाठी बोली लावता येणार असून, त्यानंतर ८४ शेअर्सच्या पटीत गुंतवणूक करता येईल. सध्या कंपनीचे ८.२० कोटी इक्विटी शेअर्स अस्तित्वात आहेत. या ऑफरमध्ये २,५०० दशलक्ष रुपयांपर्यंतच्या नवीन शेअर्सचा इश्यू तसेच प्रवर्तक भागधारकांकडून १,१८,४८,३४० इक्विटी शेअर्सची ऑफर फॉर सेल समाविष्ट आहे. यामध्ये आशिष अग्रवाल आणि सीमा अग्रवाल प्रत्येकी ५९,२४,१७० इक्विटी शेअर्सची विक्री करणार आहेत.



### आज ईएसडीएस सॉफ्टवेअर सोल्युशनचा आयपीओ

**मुंबई : दैनिक संध्या**

एआय-सक्षम क्लाउड, व्यवस्थापित सेवा, डेटा सेंटर पायाभूत सुविधा आणि सॉफ्टवेअर सोल्युशन्स क्षेत्रात कार्यरत असलेल्या ईएसडीएस सॉफ्टवेअर सोल्युशन लिमिटेडचा आयपीओ सध्या गुंतवणुकीसाठी खुला आहे. कंपनीने प्रत्येकी एक रुपया दर्शनी मूल्य असलेल्या इक्विटी शेअरसाठी ४०८ ते ४२९ रुपये असा किंमत पट्टा निश्चित केला आहे. हा आयपीओ २८ ऑगस्ट २०२६ रोजी खुला झाला असून १ सप्टेंबर २०२६ रोजी बंद होणार आहे. गुंतवणूकदारांना किमान ३४ शेअर्ससाठी आणि त्यानंतर ३४ शेअर्सच्या पटीत बोली लावता येईल. कंपनीकडे इश्यूपूर्वी प्रत्येकी एक रुपया दर्शनी मूल्याचे १०,०४,२७,७५३ इक्विटी शेअर्स आहेत. या आयपीओच्या माध्यमातून कंपनी ७,२०० दशलक्ष रुपयांपर्यंतचा नवीन इश्यू आणत आहे. २००५ मध्ये स्थापन झालेली ईएसडीएस भारतात GPUaaS, क्लाउड, व्यवस्थापित सेवा, डेटा सेंटर पायाभूत सुविधा आणि सॉफ्टवेअर सोल्युशन्सची विस्तृत श्रेणी पुरवते. कंपनीच्या मते, भारतात या सर्व सेवा एकत्रितपणे देणाऱ्या मोजक्या कंपन्यांपैकी ईएसडीएस एक आहे. आर्थिक वर्ष २०२६ मध्ये कामकाजातून मिळालेल्या महसुलाच्या बाबतीतही कंपनीने या क्षेत्रात आघाडीचे स्थान कायम ठेवले आहे.



### पेप्सिको इंडियाचा महाराष्ट्रात विस्तार; पुणे कारखान्याचा २५ वर्षांचा प्रवास

**पुणे : दैनिक संध्या**

स्नॅक्स आणि पेय क्षेत्रातील प्रमुख कंपनी पेप्सिको इंडियाने पुण्यातील आपल्या प्रमुख उत्पादन कारखान्याच्या २५ वर्षांचा प्रवास साजरा केला. महाराष्ट्रातील कंपनीच्या दीर्घकालीन विकास आणि शाश्वत उत्पादन धोरणात हा कारखाना महत्त्वाचा आधारस्तंभ ठरल्याचे कंपनीने यावेळी सांगितले. ६०० कोटी रुपयांहून अधिक गुंतवणुकीतून उभारलेला हा १५ एकरांचा कारखाना सुरुवातीच्या स्थानिक केंद्रापासून पश्चिम आणि दक्षिण भारतासाठी महत्त्वाच्या उत्पादन केंद्रात विकसित झाला आहे. कारखान्याची वार्षिक उत्पादन क्षमता सुमारे ६२,१०० टन असून, येथे लेज, कुरकुरे, चितोज, सॉलिड मस्ती आणि अंकल चिप्स यांसारख्या लोकप्रिय उत्पादनांची निर्मिती केली जाते. या कारखान्यामुळे सुमारे १,४०० प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्माण झाले आहेत. तसेच स्थानिक लघु व मध्यम उद्योगांना चालना मिळण्याबरोबरच महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील कृषी क्षेत्रातील परिवर्तनालाही गती मिळाल्याचे कंपनीने नमूद केले. पुण्यातील या उत्पादन केंद्राचा २५ वर्षांचा प्रवास हा पेप्सिको इंडियाचा महाराष्ट्राच्या औद्योगिक आणि सामाजिक-आर्थिक विकासाशी असलेला दीर्घकालीन संबंध अधोरेखित करणारा ठरला आहे.

### इपीएलची दमदार कामगिरी; महसुलात विक्रमी २५.३ टक्के वाढ

**मुंबई : दैनिक संध्या**

पॅकेजिंग सोल्युशन्स क्षेत्रातील जागतिक आघाडीची कंपनी इपीएल लिमिटेडने ३० जून २०२६ रोजी संपलेल्या पहिल्या तिमाहीचे आर्थिक निकाल जाहीर केले आहेत. कंपनीने या तिमाहीत आतापर्यंतची सर्वाधिक २५.३ टक्के महसूलवाढ नोंदवली आहे. जागतिक बाजारपेठेतील अस्थिरता आणि विविध बाह्य आव्हानांनंतरही कंपनीने केलेली ही कामगिरी व्यवसाय मॉडेलची लवचिकता, ग्राहकांशी असलेली मजबूत भागीदारी आणि शिस्तबद्ध अंमलबजावणी अधोरेखित करते. ही सलग पाचवी तिमाही असून, कंपनीने महसुलात दुहेरी अंकी वाढ नोंदवली आहे. सौंदर्यप्रसाधने आणि ओरल केअर या दोन्ही श्रेणींमध्ये २० टक्क्यांहून अधिक वाढ झाली असून, सर्वच भौगोलिक क्षेत्रांनी दुहेरी अंकी वाढ नोंदवली. कच्च्या मालाच्या किमतीतील वाढीचा परिणाम वगळता अंतर्निहित महसूलवाढ २० टक्के राहिली. कंपनीच्या एबिटामध्ये वर्षानुवर्षे १५.२ टक्के वाढ झाली आहे. इपीएलसाठी दुहेरी अंकी एबिटा वाढीची ही सलग १५वी तिमाही ठरली. तिमाहीतील EBITDA मार्जिन १८.८ टक्के, तर अंतर्निहित EBITDA मार्जिन १९.६ टक्के राहिले. वाढलेल्या खर्चाचा परिणाम योग्य किंमत निर्धारणाच्या माध्यमातून ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यात कंपनीला यश आले.

## भारतीयांमध्ये टाईप २ मधुमेहाशी संबंधित महत्त्वाचे घटक स्पष्ट

■ पुणे (दै. संध्या)

पुणे स्थित फ्रीडम फ्रॉम डायबेटीस रिसर्च फाउंडेशन (एफएफडीआरएफ) ने केलेल्या एका नव्या अभ्यासात लठ्ठपणा असलेल्या भारतीयांमध्ये टाईप 2 मधुमेहाशी संबंधित महत्त्वाचे चयापचयाशी निगडीत घटक व वैद्यकीय घटक स्पष्ट झाले आहेत.हा अभ्यास फ्रंटियर्स इन क्लिनिकल डायबेटिस अँन्ड हेल्थकेअर या आंतरराष्ट्रीय नियतकालिकेत 5 ऑगस्ट 2026 रोजी प्रकाशित करण्यात आला. (https://doi.org/10.3389/fcdhc.2026.1809646) अभ्यास करणाऱ्या टीम मध्ये सौ.अनघा व्यवहारे,डॉ. प्रमोद त्रिपाठी, डॉ.निधी कदम,डॉ. दिप्तीका तिवारी,सौ.बेबी शर्मा,डॉ.तेजस काथ्रीकोली,डॉ.मल्हार गानला आणि डॉ.बन्शी साबू यांचा समावेश होता. टाईप 2 मधुमेह हा चयापचयाशी संबंधित आजार असून दक्षिण आशियामधील लठ्ठपणा असलेल्या लोकांमध्ये याचे प्रमाण जास्त आहे.मात्र लठ्ठपणा असलेल्या प्रत्येक व्यक्तीला मधुमेह होतोच असे नाही.या अभ्यासात लठ्ठपणा असलेल्या भारतीयांमध्ये टाईप 2 मधुमेहाशी संबंधित,चयापचयाशी निगडीत, सूज संबंधित आणि औषधोपचारांशी संबंधित घटकांचा अभ्यास करण्यात आला. या अभ्यासामध्ये 1028 व्यक्तींच्या माहितीचे विश्लेषण करण्यात आले.यामध्ये टाईप 2 मधुमेह असलेल्या व नसलेल्या व्यक्तींच्या वय आणि लिंगानुसार जुळवलेल्या 514 जोड्या होत्या.सर्व सहभागी प्रौढ व लठ्ठपणा असलेले होते आणि त्यांनी जून २०20 ते ऑगस्ट २०२३ या कालावधीत एफएफडीच्या लाईफस्टाईल इंटरव्हेंशन प्रोग्राममध्ये भाग घेतला होता. अभ्यासात बीटा सेल्सची कमी झालेली कार्यक्षमता व यामुळे इन्सुलिन तयार करण्याच्या शरीराच्या क्षमतेवर झालेला विपरीत परिणाम हे टाईप 2 मधुमेहाशी संबंधित सर्वात महत्त्वाचे घटक असल्याचे दिसून आले.इन्सुलिन प्रतिरोधकता (रेझिस्टंन्स) हाही मधुमेहाशी संबंधित महत्त्वाचा घटक दिसून आला.याशिवाय एचडीएल कोलेस्ट्रॉलची कमी असलेली पातळी, सूज चे सूचक असलेल्या एचएससीआरपीची वाढलेली पातळी,लठ्ठपणा (बीएमआय २५.० ते २९.९) आणि उच्च रक्तदाबासाठी औषधांचा वापर यांचाही समावेश होता. अभ्यास करणाऱ्या टीमने टाईप 2 मधुमेहाचा धोका असलेल्या व्यक्ती ओळखण्यासाठी या घटकांच्या आधारावर एक सांख्यिकीय मॉडेल (स्टॅटिस्टिकल मॉडेल) तयार केले.

## संकष्टी चतुर्थीनिमित्त भाविकांची गर्दी

■ जुन्नर (दै. संध्या)


सोमवार दि.३१ ऑगस्ट २०२६ रोजी संकष्टी चतुर्थीनिमित्त अष्टविनायक तिर्थक्षेत्र श्री क्षेत्र लेण्याद्री (ता. जुन्नर) येथील 'श्री गिरीजात्मज' गणपतीचे हजारो भाविकांनी दर्शन घेतले. संकष्टी चतुर्थी व श्रावणी सोमवारमुळे भाविकांची व पर्यटकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होती. श्री क्षेत्र लेण्याद्री परिसरास यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. यानिमित्ताने श्री गिरिजात्मजाच्या मूर्तीस व मंदिरात फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती.

श्री लेण्याद्री गणपती देवस्थानचे वतीने सकाळी ०६.१५ वाजता देवस्थानचे विश्वस्त सदाशिव ताम्हाणे यांच्या हस्ते श्रींचा अभिषेक व महापुजा करण्यात आली. त्यानंतर भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला. संकष्टी चतुर्थीनिमित्त 'श्री गिरिजात्मज' गणेशाच्या मूर्तीस व मंदिर परिसरात फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. देवाचे नैवेद्याकरीता मंचर येथील बाळासाहेब बापु थोरात यांनी ३ कॅरेट केळी प्रसाद दिला. मंदिरात सकाळी ७ वाजता, दुपारी १२ वाजता व सायंकाळी ७ वाजता महाआरती करण्यात आली. संकष्टी चतुर्थीनिमीत्त देवस्थानचे वतीने दिवसभर विविध धार्मिकविधी करण्यात आले. भाविकांना देवस्थान ट्रस्ट मार्फत विविध



सोयी सुविधा पुरविण्यात आल्या. संकष्टी चतुर्थी व श्रावणी सोमवारमुळे भाविकांची व पर्यटकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होती. भाविकांचे दर्शन सुलभ व्हावे याकरीता गर्दीचे नियोजन देवस्थान ट्रस्टच्यावतीने करण्यात आले होते. यावेळी देवस्थानचे अध्यक्ष अॅड.संजय ढेकणे, उपाध्यक्ष गोविंद मेहेर, सेक्रेटरी शंकर ताम्हाणे, खजिनदार भगवान हांडे, विश्वस्त मच्छिंद्र शेटे, सदाशिव ताम्हाणे, काशिनाथ लोखंडे, जयवंत डोके कार्यालयीन सचिव रोहीदास बिडवई, व्यवस्थापक निलेश सरजिने, कर्मचारी व ग्रामस्थ तसेच भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. सायंकाळी श्री मुक्ताई प्रासादिक भजनी मंडळ, शिवेचीवाडी यांचे संगीत भजन झाले. रात्री चंद्रोदयाच्या वेळी श्रींची महाआरती करण्यात आली. त्यानंतर गोळेगाव येथील जय महाराष्ट्र ग्रुप व राजगुरुनगर येथील संकेत बजरंग मुंढे यांच्यावतीने भाविकांकरीता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. संकष्टी चतुर्थीनिमित्त दिवसभरात विविध क्षेत्रातील मान्यवरांनी श्रीं च्या दर्शनाचा लाभ घेतला. तसेच पुणे, अहमदनगर, मुंबई, ठाणे, नाशिक व जुन्नर परिसरातुन मोठ्या प्रमाणात भाविक श्रींच्या दर्शनासाठी आले होते. अशी माहिती देवस्थानचे अध्यक्ष अॅड.संजय ढेकणे व सेक्रेटरी शंकर ताम्हाणे यांनी दिली.

## मुंबईतील दहीहंडी व गणेशोत्सवात गौतमी पाटील यांच्या कार्यक्रमांवर बंदी घाला



### मुंबई शिक्षक मंडळाची मुख्यमंत्री व पोलीस प्रशासनाकडे मागणी

**मुख्य मागण्या**

- पूर्वतपासणी अनिवार्य करा: दहीहंडी व गणेशोत्सवातील अशा नृत्य कार्यक्रमांची गाणी, नृत्यप्रकार, वेशभूषा व सादरीकरणाची पूर्वतपासणी (Scrutiny) करण्यात यावी.
- कडक अटी व शर्ती: आवश्यक Performance Licence व पोलीस परवानगीशिवाय कार्यक्रम आयोजित करू दिले जाऊ नयेत. परवानगी दिल्यास वेळ, वेशभूषा व सादरीकरणाबाबत कडक नियमावली लागू करावी.
- अश्लीलता आढळल्यास परवानगी नाकारावी: सादरीकरण सार्वजनिक शालीनतेशी विसंगत असल्यास त्वरित परवानगी नाकारण्यात यावी आणि उल्लंघन झाल्यास कडक कायदेशीर कारवाई करावी.
- सिंगल-विंडो प्रणालीत समावेश: BMC द्वारे २०२६ च्या गणेशोत्सवासाठी सुरू करण्यात आलेल्या ऑनलाईन 'सिंगल-विंडो' पोलीस NOC आणि परवानगी प्रक्रियेत या छाननीचा समावेश करावा.

■ भिवंडी (दै. संध्या)


मुंबईतील दहीहंडी, गणेशोत्सव व इतर धार्मिक-सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सार्वजनिक शालीनता, धार्मिक वातावरण आणि कायदा-सुव्यवस्थेचे रक्षण करण्यासाठी प्रसिद्ध नृत्यांगना गौतमी पाटील यांच्या नृत्य कार्यक्रमांना सरसकट परवानगी देऊ नये, अशी आग्रही मागणी *मुंबई शिक्षक मंडळाने* (मुंबई शहर शिक्षक विकास मंडळ) केली आहे. यासंदर्भात मंडळाने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, पोलीस महासंचालक, मुंबई पोलीस आयुक्त आणि बृहन्मुंबई महानगरपालिका (BMC) आयुक्तांना निवेदन पाठवले आहे.

या निवेदनात नमूद केले आहे की, महाराष्ट्रातील दहीहंडी आणि गणेशोत्सव हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून आपल्या संस्कृतीचा अविभाज्य भाग आहेत. या उत्सवांमध्ये महिला, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होतात. महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ अंतर्गत सार्वजनिक मनोरंजनातील कार्यक्रमांवर सार्वजनिक सुव्यवस्था आणि शालीनतेच्या दृष्टीने नियमन करण्याची तरतूद आहे. मुंबई शिक्षक मंडळाने स्पष्ट केले आहे की, त्यांचा कोणत्याही कलाकाराच्या वैयक्तिक किंवा कलात्मक स्वातंत्र्याला विरोध नाही, परंतु धार्मिक उत्सवांच्या व्यासपीठाचे पावित्र्य राखणे आवश्यक आहे. प्रशासनाने या विषयाची गंभीर दखल घेऊन आयोजकांना योग्य त्या सूचना द्याव्यात, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

## आदिवासी हक्कांसाठी एकजुटीची हाक

■ भिवंडी (दै. संध्या)

- संयुक्त आदिवासी हक्क संरक्षण समितीची विचारमंथन सभा उत्साहात
- ५० हून अधिक संस्था-संघटनांचा सहभाग; नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत



पालघर जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक, आरोग्य तसेच विविध मूलभूत प्रश्नांवर व्यापक पातळीवर काम करण्यासाठी कार्यरत असलेल्या संयुक्त आदिवासी हक्क संरक्षण समितीची विचारमंथन सभा रविवारी (३० ऑगस्ट) कासा येथील पूज्य आचार्य भिसे विद्यालयात उत्साहात पार पडली. समितीच्या नवीन कार्यकारिणीची निवड, समितीची ध्येय-धोरणे, आदिवासी समाजासमोरील विविध प्रश्न आणि आगामी काळातील कार्यदिशा यावर यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली.

पालघर जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या विविध प्रश्नांसाठी गेल्या पाच-सहा वर्षांपासून संयुक्त आदिवासी हक्क संरक्षण समिती कार्यरत आहे. जिल्ह्यातील ५० हून अधिक संस्था व सामाजिक संघटनांना एका मंचावर आणत आदिवासी समाजाच्या व्यापक आणि दीर्घकाळापासून दुर्लक्षित राहिलेल्या प्रश्नांना शासन दरबारी प्रभावीपणे मांडण्याचे काम समितीच्या माध्यमातून केले जात आहे.

शिक्षण, आरोग्य, रोजगार, आदिवासी विद्यार्थ्यांच्या समस्या, आश्रमशाळा व वसतिगृहांचे प्रश्न, आदिवासींचे हक्क, पायाभूत सुविधा तसेच शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी आदी विषयांवर आगामी काळात संघटितपणे पाठपुरावा करण्याची गरज यावेळी व्यक्त करण्यात आली. समितीच्या नवनिर्वाचित कार्यकारिणीच्या माध्यमातून आगामी काळात कोणत्या पद्धतीने कामकाज करायचे, विविध संघटनांमध्ये समन्वय कसा वाढवायचा आणि आदिवासी समाजाच्या प्रश्नांना शासनस्तरावर अधिक प्रभावीपणे कसे मांडायचे, याबाबत पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आपली मते मांडली. यावेळी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. समितीच्या अध्यक्षपदी डॉ. सुनील पऱ्हाड यांची निवड झाल्याबद्दल उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन केले. यावेळी डहाणू विधानसभा मतदारसंघाचे आमदार कॉ. विनोद निकोले यांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. आदिवासी समाजाच्या सामाजिक व शैक्षणिक प्रश्नांवर समितीच्या माध्यमातून होणाऱ्या कार्याला आपले नेहमीच सहकार्य व पाठिंबा राहील, असे मत त्यांनी व्यक्त केले.आदिवासी समाजाच्या विविध प्रश्नांवर पक्षीय मतभेद बाजूला ठेवून सर्व संस्था-संघटनांनी एकत्रितपणे काम केल्यास शासनाचे लक्ष वेधून घेणे अधिक प्रभावीपणे शक्य होईल. त्यासाठी समितीने व्यापक समन्वय साधून पुढील काळात काम करावे, अशी अपेक्षाही यावेळी व्यक्त करण्यात आली.

विचारमंथन सभेला माजी आमदार अमित घोडा, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा वैदेही वाढाण, माजी समाजकल्याण सभापती पांडुरंग बेलकर, समितीचे कार्याध्यक्ष माधव लिलका, राहुल धूम, समितीचे सचिव नितीन बोंबाडे,खजिनदार विलास बेलकर, उपाध्यक्ष अशोक भोईर, सहकार्याध्यक्ष अँड.विराज गडग, प्रसिद्धी प्रमुख निलेश कासट, रामदास हरवटे,संजय भुयाळ वसंत भसरा यांच्यासह विविध आदिवासी संस्था-संघटनांचे अध्यक्ष, पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने आदिवासी कार्यकर्ते उपस्थित होते. सभेच्या माध्यमातून आदिवासी समाजाच्या प्रश्नांवर एकत्रित आणि संघटितपणे लढा देण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. आगामी काळात समितीच्या माध्यमातून जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या विविध प्रश्नांना प्राधान्य देऊन शासनाकडे पाठपुरावा करण्याचे नियोजन करण्यात येणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### विकास आराखड्याची अंमलबजावणी तातडीने मार्गी लावू - सचिन अहिर

**चाकण : दैनिक संध्या**

चाकणच्या विकास आराखड्याची अंमलबजावणी तातडीने मार्गी लावू असे आश्वासन महाराष्ट्र विधान परिषदेचे उपसभापती सचिन अहिर यांनी येथे दिले. चाकण नगरपरिषदेमध्ये नव्याने नियुक्त झालेल्या विविध विषय समिती सभापतींच्या नूतन दालनांचे उद्घाटन सचिन अहिर यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. या प्रसंगी महिला व बालकल्याण समिती सभापती रूपाली कांडगे, गटनेते तथा नगरसेवक नितीन गोरे, बांधकाम समिती सभापती रणजीत जरे, आरोग्य समिती सभापती मंगेश कांडगे यांच्या नूतन दालनांचे उद्घाटन फित कापून करण्यात आले. याप्रसंगी नगरसेविका रूपाली कांडगे यांनी चाकणमधील महिलांच्या सक्षमीकरणासाठी व महिला बचत गटांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी चाकण येथे 'अस्मिता भवन' उभे राहिले पाहिजे, अशी आग्रही मागणी केली. या सोहळ्याला नगराध्यक्षा मनीषा गोरे, उपनगराध्यक्षा जयश्री नायकवाडी, माजी नगरसेवक राहुल कांडगे, नगरसेवक हर्षद लेंडघर, नगरसेविका आरती परदेशी, नगरसेविका पूनम शेवकरी, सुवर्णा राक्षे, स्वाती लेंडघर, साधना गोरे, अनिता घोगरे, शिवसेना शहर प्रमुख महेश शेवकरी, सचिन वाघमारे, विठ्ठल चांदणे, संदेश झाडे, प्रीतम परदेशी, श्याम राक्षे आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. महेश शेवकरी यांनी सुत्रसंचालन केले. गटनेते नितीन गोरे यांनी स्वागत केले. नगराध्यक्षा मनिषा गोरे यांनी आभार मानले.

### मीरा शिंदे यांना हिंदरत्न कामगार पुरस्कार

**पिंपरी, पुणे : दैनिक संध्या**

हिंद कामगार संघटनेच्या वर्धापन दिनानिमित्त दरवर्षी कामगार क्षेत्रातील एका व्यक्तीला'हिंद रत्न कामगार पुरस्कार'देऊन गौरविण्यात येते. यावर्षीचा"हिंद रत्न कामगार पुरस्कार २०२६" पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नूतन भोसरी रुग्णालयातील स्वेच्छा निवृत्त परिचारिका मीरा शिंदे यांना जाहीर करण्यात आला आहे अशी माहिती हिंद कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष आणि इंटकचे प्रदेशाध्यक्ष डॉ. कैलास कदम यांनी प्रसिद्धीस दिली आहे. या पुरस्काराचे स्वरूप मानपत्र, स्मृतीचिन्ह, शाल, श्रीफळ असे आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा बुधवारी (दि. २ सप्टेंबर), सायंकाळी ६ वाजता, हिंद कामगार संघटनेच्या खराळवाडी, पिंपरी येथील कार्यालयात पिंपरी चिंचवडचे महापौर रवी लांडगे, इंटकचे प्रदेशाध्यक्ष डॉ. कैलास कदम यांच्या उपस्थितीत होणार आहे. यावेळी महिला बालकल्याण समितीच्या माजी अध्यक्ष निर्मलाताई सद्गुरु कदम, माजी नगरसेवक सद्गुरु कदम आदी उपस्थित राहणार आहेत. यापूर्वी हिंद रत्न कामगार पुरस्कार जेष्ठ कामगार नेते माधव रोहम, मानव कांबळे, शिवाजी खटकाळे, उत्तम गायकवाड, नंदकुमार सातुर्डेकर, अनिल सोनीकर, किसन येवले, राजेंद्र मोहिते, जगन्नाथ हडप, रोहिदास गायकवाड, नंदू घरत, शेखर देवडेकर, संदीप आयरे, उल्हास पारखे, राजीव राऊत, दिवंगत कैलास खटकाळे या कामगार प्रतिनिधींना देण्यात आला आहे अशी माहिती संघटनेचे सरचिटणीस यशवंत सुपेकर यांनी दिली आहे.

### भारत कनेक्टच्या फॉरेक्स व्यवहारांनी १३.८९ कोटींचा टप्पा पार

**मुंबई : दैनिक संध्या**

नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (NPCI) ची पूर्ण मालकीची उपकंपनी असलेल्या भारत बिलपे लिमिटेडने (NBBL) परकीय चलन व्यवहार क्षेत्रात महत्त्वपूर्ण कामगिरी नोंदवली आहे. एप्रिल ते जुलै २०२६ या अवघ्या चार महिन्यांच्या कालावधीत भारत कनेक्ट प्लॅटफॉर्मद्वारे झालेल्या फॉरेक्स व्यवहारांचे मूल्य ११.१९ कोटी रुपयांवर पोहोचले आहे. त्यामुळे सुरुवातीपासूनच्या व्यवहारांचे एकत्रित मूल्य १३.८९ कोटी रुपये झाले आहे. भारत कनेक्टवरील फॉरेक्स श्रेणी ग्लोबल फिनटेक फेस्ट (GFF) २०२५ मध्ये रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या उप-गव्हर्नरांच्या हस्ते सुरू करण्यात आली होती.

## थोडक्यात पण महत्वाचे



### बीआरटी मार्गावरच खासगी वाहनांचा कब्जा

पिंपरी : दैनिक संध्या

पिंपरी: पिंपरी-चिंचवड शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत राहावी आणि पीएमपीएमएल बसला वाहतुकीत अडथळा येऊ नये, यासाठी उभारण्यात आलेल्या बीआरटी मार्गांमध्येच आता खासगी वाहनांचे अतिक्रमण वाढताना दिसत आहे. शहरातील विविध बीआरटी मार्गांवरील बसस्थानकांच्या परिसरात खासगी वाहनांची रांग लागलेली असल्याने पीएमपीएमएल बसला स्थानकात प्रवेश करताना आणि बाहेर पडताना अडथळ्यांचा सामना करावा लागत आहे. परिणामी बसचालकांना स्थानकाजवळच वाहतूक कोंडीत अडकून राहावे लागत असल्याचे चित्र अनेक ठिकाणी पाहायला मिळत आहे. बीआरटी मार्ग हा सार्वजनिक वाहतुकीतील बसच्या जलद आणि सुरक्षित प्रवासासाठी राखीव ठेवण्यात आला आहे. मात्र, अनेक ठिकाणी या मार्गावरच खासगी चारचाकी तसेच दुचाकी वाहने उभी केली जात आहेत. विशेषतः बीआरटी बसस्थानकांच्या आसपास काही वेळासाठी वाहन थांबविण्याच्या नावाखाली वाहनचालकांकडून या मार्गाचा वापर केला जातो. काही ठिकाणी तर रस्त्याच्या कडेला वाहनांची अक्षरशः रांग लागलेली दिसते. यामुळे बसस्थानकात बस आणताना पीएमपीएमएलच्या चालकांना वाहनांचा अडथळा टाळण्यासाठी कसरत करावी लागत आहे. अनेकदा बसला थांब्यावर व्यवस्थित उभे करता येत नसल्याने प्रवाशांना रस्त्याच्या बाजूने बसमध्ये चढावे-उतरावे लागण्याची परिस्थिती निर्माण होते. त्यातच बीआरटी मार्गावर एखादे खासगी वाहन अडथळा ठरल्यास मागून येणाऱ्या बसचीही कोंडी होण्याची शक्यता वाढते. बसचा मार्ग खासगी वाहनांसाठी की सार्वजनिक वाहतुकीसाठी? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. बीआरटी मार्ग तयार करताना सार्वजनिक वाहतुकीला प्राधान्य देण्याचा उद्देश होता. मात्र, प्रत्यक्षात या मार्गावरच खासगी वाहनांचा वाढता वावर आणि बेकायदा पार्किंग यामुळे बीआरटी व्यवस्थेच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासला जात असल्याचे चित्र आहे. शहरातील विविध प्रमुख रस्त्यांवर बीआरटी मार्गाच्या प्रवेशद्वारांपासून ते बसस्थानकांच्या परिसरापर्यंत खासगी वाहनांची वर्दळ वाढली आहे. वाहतूक पोलिसांकडून अधूनमधून कारवाई केली जात असली तरी कारवाईनंतर काही वेळातच पुन्हा त्याच ठिकाणी वाहने उभी राहत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे केवळ दंडात्मक कारवाई न करता बीआरटी मार्गावर नियमित गस्त, सीसीटीव्हीच्या माध्यमातून निगराणी आणि वाहनचालकांवर सातत्याने कारवाई करण्याची गरज निर्माण झाली आहे.

### मावळच्या एसटी सेवेला 'जिजाऊ'ची साथ; पाच नव्या स्मार्ट बसेसचे लोकार्पण..!

पिंपरी : दैनिक संध्या

मावळ तालुक्यातील ग्रामीण भागातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम, सुरक्षित आणि आधुनिक करण्याच्या दृष्टीने तळेगाव एसटी आगाराला प्राप्त झालेल्या पाच नव्या 'राजमाता जिजाऊ' स्मार्ट एसटी बसेसचे लोकार्पण आमदार सुनील शेळके यांच्या हस्ते करण्यात आले. आमदार सुनील शेळके यांच्या प्रयत्नातून या नव्या बसेस उपलब्ध झाल्याने मावळातील ग्रामीण भागातील प्रवाशांना अधिक चांगली आणि आधुनिक परिवहन सेवा मिळणार आहे. मावळ तालुक्यातील दुर्गम आणि ग्रामीण भागातील नागरिकांना शिक्षण, रोजगार, बाजारपेठ तसेच विविध शासकीय कामांसाठी प्रवास करावा लागतो. या पार्श्वभूमीवर नव्या बसेस उपलब्ध झाल्याने ग्रामीण भागातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे. विद्यार्थी, शेतकरी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांसह सर्वसामान्य प्रवाशांना या बसेसचा मोठा फायदा होणार आहे. तळेगाव आगारात यापूर्वी ३८ बसेस कार्यरत होत्या. गतवर्षी मिळालेल्या १० आणि यावर्षी आमदार सुनील शेळके यांच्या प्रयत्नातून प्राप्त झालेल्या पाच अशा एकूण १५ नव्या बसेस आगारात दाखल झाल्याने आता आगारातील बसेसची संख्या ४३ झाली आहे. त्यामुळे मावळ तालुक्यातील विविध ग्रामीण मार्गांवरील एसटी सेवा अधिक सक्षम करण्यास मदत होणार असून प्रवाशांची गैरसोय कमी होण्याची अपेक्षा आहे. 'राजमाता जिजाऊ' स्मार्ट बसेसमध्ये ३×२ आसन व्यवस्था असून तब्बल ५६ प्रवाशांची आसन क्षमता आहे. जुन्या साधारण बसेसच्या तुलनेत या बसेसमध्ये १६ आसने अधिक आहेत. त्यामुळे अधिक प्रवाशांना एकाच फेरीत प्रवास करता येणार असून ग्रामीण भागातील प्रवाशांसाठी ही सुविधा महत्त्वपूर्ण ठरणार आहे. प्रवाशांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्यात आले असून प्रत्येक बसमध्ये चार सीसीटीव्ही कॅमेरे तसेच आपत्कालीन परिस्थितीसाठी पॅनिक बटण उपलब्ध करून देण्यात आले आहे. याशिवाय प्रत्येक थांबा आणि आवश्यक सूचना स्पष्टपणे प्रवाशांपर्यंत पोहोचविण्यासाठी सार्वजनिक उद्घोषणा प्रणाली, मार्गाची माहिती देण्यासाठी इलेक्ट्रॉनिक डिजिटल मार्ग फलक आणि बसचे थेट लोकेशन ट्रॅक करण्यासाठी जीपीएस यंत्रणा उपलब्ध आहे. नव्या स्मार्ट बसेसमुळे प्रवाशांना अधिक आरामदायी, सुरक्षित आणि सुखकर प्रवासाचा अनुभव मिळणार आहे. विशेषतः ग्रामीण भागातील नागरिकांसाठी आधुनिक परिवहन सेवा उपलब्ध झाल्याने सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला नवी गती मिळणार आहे.

### पिंपरी-चिंचवड शहर जिल्हा भाजपाची कोअर कमिटी जाहीर

पिंपरी : दैनिक संध्या



भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपरी-चिंचवड शहर जिल्हा भाजपाची नवीन कोअर कमिटी जाहीर करण्यात आली आहे. प्रदेश सरचिटणीस निरंजन डावखरे यांच्या स्वाक्षरीने नुकतीच ही कार्यकारिणी घोषित करण्यात आली आहे. या नवीन कोअर कमिटीमध्ये शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे, जिल्हा प्रभारी भरत पाटील, सरचिटणीसपदी मोरेश्वर शेडगे, मधुकर बच्चे, विकास डोळस, वैशाली खाडे यांचा समावेश करण्यात आला आहे. तसेच आमदार महेश लांडगे, शंकर जगताप, उमा खापरे, अमित गोरखे यांना स्थान देण्यात आले आहे. महापौर रवी लांडगे, माजी खासदार अमर साबळे, माजी आमदार अश्विनी जगताप, माजी जिल्हाध्यक्ष सदाशिव खाडे यांचा समावेश करण्यात आला आहे. या नियुक्त्यांमुळे आगामी काळात पिंपरी-चिंचवड शहरातील भाजप संघटनेला अधिक बळकटी मिळणार असल्याचे पक्ष कार्यकर्त्यांमध्ये बोलले जात आहे. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे विविध स्तरांतून अभिनंदन करण्यात येत असून, पक्षाची विचारधारा आणि विकासाभिमुख धोरणे अधिक प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी ही कार्यकारिणी महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. नवनियुक्त सर्व पदाधिकाऱ्यांवर शुभेच्छांचा वर्षाव होत असून, पक्ष संघटन अधिक मजबूत करण्यासाठी ते उल्लेखनीय कार्य करतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.



# एकवीरा देवी मंदिर परिसरातील समस्यांवर ग्रामस्थ आक्रमक

## रोप वे रद्द करण्यासाठी रास्ता रोको, पावसातही वेहरगाव-दहिवली ग्रामस्थांचा मोठा सहभाग

■ पिंपरी(दै. संध्या)

लोणावळा: श्रीक्षेत्र एकवीरा देवी देवस्थान परिसरातील विविध प्रलंबित मूलभूत समस्या तातडीने सोडवाव्यात. तसेच, मंदिर परिसरात नव्याने प्रस्तावित करण्यात आलेला रोप वे प्रकल्प कायमस्वरूपी रद्द करावा, या प्रमुख मागणीसाठी वेहरगाव व दहिवली ग्रामस्थांनी रविवारी आक्रमक पवित्रा घेत रास्ता रोको आंदोलन केले. पावसाची तमा न बाळगता लहान मुलांसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी झाले होते. एकवीरा देवी मंदिर परिसरात पायऱ्या, पायवाट, पिण्याचे पाणी, शौचालये, वाहतूक व्यवस्था आणि सुरक्षाव्यवस्था यासारख्या मूलभूत समस्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. या प्रश्नांबाबत संबंधित शासकीय विभागांकडे वारंवार निवेदने देऊनही अपेक्षित कार्यवाही झालेली नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. कार्ला फाटा ते श्री आई एकवीरा देवी मंदिर व गडाकडे जाणाऱ्या रस्त्याचे प्रलंबित काम तातडीने पूर्ण करावे, अशीही मागणी करण्यात आली. भाविकांसाठी सुरू असलेल्या पायऱ्यांच्या कामाची चौकशी करून ते काम तातडीने पूर्ण करावे, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. रास्ता रोको आंदोलनाची माहिती मिळाल्यानंतर प्रशासनाने तातडीने ग्रामस्थांशी चर्चा केली. मावळचे तहसीलदार विक्रम देशमुख यांनी आंदोलनस्थळी उपस्थित राहून ग्रामस्थांच्या मागण्या जाणून घेतल्या. संबंधित सर्व शासकीय विभागांची संयुक्त बैठक गुरुवारी (दि. ३) घेऊन प्रलंबित मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन त्यांनी दिले. या आश्वासनानंतर ग्रामस्थांनी रास्तारोको आंदोलन मागे घेतले. प्रशासनाने दिलेल्या आश्वासनानंतर आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले असले तरी मागण्या पूर्ण न झाल्यास आगामी नवरात्रोत्सवाच्या काळात आणखी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा वेहरगाव-दहिवली ग्रामस्थांनी दिला आहे. त्यामुळे ३ सप्टेंबर रोजी होणाऱ्या संयुक्त बैठकीकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

वेहरगाव-दहिवली ग्रामस्थांनी गावातील विविध प्रलंबित प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी एकवीरा देवी मंदिराच्या पायथ्यापासून कार्ला फाट्यापर्यंत मोर्चा काढला. त्यानंतर पुणे-मुंबई महामार्गावर ग्रामस्थांनी ठिय्या देत रास्तारोको आंदोलन केले. यामुळे काही काळ महामार्गावरील वाहतुकीवर परिणाम झाला होता. आंदोलनकर्त्यांनी या वेळी स्पष्ट भूमिका मांडताना सांगितले, की आमचा विकासाला विरोध नाही. मात्र, प्रथम मंदिर परिसरातील प्रलंबित समस्या सोडवा, स्थानिक व्यावसायिक, रिक्षाचालक आणि अन्य व्यवसायांवर अवलंबून असलेल्या ग्रामस्थांचा रोजगार हिरावून घेणारा रोप वे प्रकल्प रद्द करावा, अशी मागणी केली.

### कायमस्वरूपी पोलिस चौकीची मागणी

देवस्थान परिसरात मोठ्या प्रमाणात भाविक व पर्यटकांची गर्दी होत असल्याने वाहतूककोंडी तसेच वादाचे प्रकार घडत असल्याचे ग्रामस्थांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले. त्यामुळे देवस्थान परिसरात कायमस्वरूपी पोलिस चौकी सुरू करून आवश्यक पोलिस कर्मचारी नियुक्त करावेत, अशी मागणी करण्यात आली. भाविक व पर्यटकांसाठी शुद्ध व नियमित पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच पुरेशी आणि स्वच्छ शौचालये उपलब्ध करून द्यावीत, देवस्थान परिसरात अनधिकृत वाहतूक तसेच मद्यपान करून मंदिराच्या पावित्र्याला धोका निर्माण करणाऱ्यांवर तातडीने कारवाई करावी आणि वन विभागाच्या जागेतील वाहनतळ ग्रामपंचायतीकडे वर्ग करावे, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

# दापोडीच्या रस्त्यांवर अतिक्रमणांचा विळखा

## बेशिस्त पार्किंगमुळे वाहतूक कोंडी, नागरिक त्रस्त

■ पिंपरी(दै. संध्या)





दापोडी: एकीकडे पिंपरी-चिंचवड शहरात अतिक्रमण मोहीम तीव्रतेने राबवली जात असली तरी दुसरीकडे मात्र दापोडी आणि परिसरातील मुख्य रस्त्यांवर बेशिस्तपणे उभी केली जाणारी वाहने आणि मोठ्या प्रमाणावर झालेल्या अतिक्रमणांमुळे स्थानिक नागरिक त्रस्त आहेत. दापोडी गावठाणात तर अक्षरशः अतिक्रमण बोकाळले आहे. परंतु महापालिकेचा अतिक्रमण विभाग केवळ बघ्याची भूमिका घेत असल्याने दापोडी परिसरातील नागरिक व वाहनचालक त्रस्त आहेत. त्यामुळे दापोडी परिसरातील रस्ते कधी घेणार मोकळा श्वास असे विचारण्याची वेळ दापोडीकरांवर आली आहे.

दापोडीतील आबा काटेनगर परिसर, तथागत गौतम बुद्ध उद्यान परिसर, स्मशानभूमी रस्ता, वि. भा. पाटील पुलाजवळील रस्ता, रेल्वे फाटकाजवळील परिसर या मुख्य मार्गांवर सध्या बेशिस्तपणे उभ्या राहणाऱ्या वाहनांनी आणि अतिक्रमणांनी रस्त्यांचा श्वास कोंडला आहे. अशा प्रवृत्तींवर प्रशासन लगाम घालणार का, असा संतप्त सवाल आता नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे. दापोडीतील रस्त्यांवर फळ आणि भाजीपाला विक्रेत्यांकडून मोठ्या प्रमाणात अतिक्रमण करण्यात आले आहे. रस्त्यावरील अतिक्रमणामुळे रस्ता अरुंद झाला आहे. परिणामी सकाळी तसेच सायंकाळी या भागात मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडीचा वाहनचालकांना सामना करावा लागत आहे. प्रशस्त रस्ते असूनही अतिक्रमणामुळे या भागाचे विद्रूपीकरण होत आहे. मुख्य रस्त्यांवरच होणाऱ्या बेकायदेशीर वाहन पार्किंगमुळे लहान मोठे अपघात होणे ही नित्याची बाब झाली आहे. जोपर्यंत अशा बेशिस्त प्रवृत्तींवर कठोर कारवाई होत नाही, तोपर्यंत या भागाचे बकालीकरण थांबणार नाही, अशी संतप्त भावना नागरिकांमधून उमटत आहे. पिंपळे गुरवकडून येणाऱ्या पीएमपीएमएलच्या बस आबा काटेनगर परिसर मार्गावरून पुण्याकडे जातात. तसेच मुंबई-पुणे महामार्गाला पर्यायी रस्ता म्हणून देखील या मार्गाचा वापर अनेक मोठ्या गाड्या, खासगी आणि अवजड वाहनांकडून केला जातो. त्यामुळे या रस्त्यांवर दिवस-रात्र वाहनांची मोठी वर्दळ असते.

# बीआरटीएस थांब्यावर पीएमपीएमएल बस बंद

■ पिंपरी(दै. संध्या)



कासारवाडी परिसरातील खराब रस्ते, भुयारी मार्गातून होणारी वाहनांची मोठी वर्दळ आणि त्यातच नादुरुस्त होणाऱ्या वाहनांमुळे वाहतुकीची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे. रविवारी कासारवाडी बीआरटीएस थांब्याजवळ पीएमपीएमएलची बस रस्त्यातच नादुरुस्त होऊन बंद पडल्याने वाहतुकीचा खोळंबा झाला. बसच्या मागे आलेल्या इतर बसेसही एकामागोमाग एक उभ्या राहिल्याने वाहनांच्या रांगा लागल्या. बीआरटीएस थांब्याजवळच बस बंद पडल्याने त्यातील प्रवाशांना खाली उतरावे लागले. रस्त्यावर वाहनांची मोठी वर्दळ असल्याने प्रवाशांनी सुरक्षिततेसाठी समोरील पदपथाचा आधार घेतला. त्यामुळे पदपथावरही प्रवाशांची गर्दी झाली होती. बंद पडलेली बस हटविण्यास विलंब झाल्याने इतर पीएमपीएमएल बसेसनाही पुढे जाण्यास अडथळा निर्माण झाला.

कासारवाडी परिसरातील रस्त्यांची अवस्था आधीच खराब आहे. कासारवाडी भुयारी मार्गातून जाणाऱ्या वाहनांची मोठी संख्या असल्याने या भागात नियमितपणे वाहतुकीचा ताण निर्माण होतो. अशा परिस्थितीत बीआरटीएस थांब्याजवळच पीएमपीएमएल बस बंद पडल्याने कोंडीत आणखी भर पडली. बीआरटीएस थांबा हा प्रवाशांची मोठी वर्दळ असलेला परिसर आहे. अशा ठिकाणी बस नादुरुस्त झाल्यानंतर प्रवाशांना रस्त्याच्या कडेला उतरावे लागणे ही प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने चिंतेची बाब आहे. बसच्या बिघाडामुळे वाहतूक विस्कळीत होण्याबरोबरच प्रवाशांच्या सुरक्षेचाही प्रश्न निर्माण झाला.

कासारवाडीतील खराब रस्त्यांची दुरुस्ती करावी तसेच बीआरटीएस थांब्याजवळ बस नादुरुस्त झाल्यास वाहतुकीला अडथळा निर्माण होऊ नये यासाठी पीएमपीएमएल आणि वाहतूक विभागाने प्रभावी नियोजन करावे, अशी मागणी नागरिक वाहनचालक आणि प्रवाशांकडून होत आहे. कासारवाडी येथे मागील काही दिवसांपासून रस्ते खराब झाले आहेत. खड्डेमय रस्त्यामुळे या भागातील वाहतूक मंदावली आहे. त्यात नादुरुस्त बसमुळे कासारवाडीकरांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला. अजून किती दिवस या समस्यांना सामोरे जावे लागणार, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

# 'तत्वम फाउंडेशन'तर्फे गुरुकुलमच्या ३५० लेकरांसोबत साजरी झाली स्नेहाची राखीपौर्णिमा

■ चिंचवड (दै. संध्या)

रक्ताच्या नात्यांपलीकडे जाऊन समाजातील उपेक्षित घटकाला प्रेमाची आणि आपुलकीची ऊब देणे हीच खरी सणांची सार्थकता असते, याचा प्रत्यय चिंचवड येथील पुनरुत्थान समरसता गुरुकुलममध्ये आला. वंचित, भटके आणि विमुक्त समाजातील मुलांच्या चेहऱ्यावर उत्सवाचा खरा आनंद फुलवण्याच्या उदात्त भावनेतून 'तत्वम सोशल फाउंडेशन'च्या वतीने गुरुकुलममधील तब्बल 350 मुला-मुलींसोबत अनोखा रक्षाबंधन सोहळा आणि स्नेहभोजनाचा संवेदनशील उपक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. उपक्रमादरम्यान फाउंडेशनने नेलेल्या राख्यांनी वातावरण भावूक झाले होते. गुरुकुलममधील मुलींनी तेथील मुलांना मायेची राखी बांधली, तसेच उपस्थित फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनाही राखी बांधत अनोखा जिव्हाळा जपला. रक्षाबंधन हा केवळ रूढी परंपरेतील सण नसून समाजातील दुर्लक्षित घटकांप्रती वाटणारी माणुसकी, आदर आणि सामाजिक बांधिलकीची ती एक प्रतिज्ञा आहे, ही भावना यावेळी अधोरेखित झाली. याप्रसंगी ज्येष्ठ विचारवंत व समाजसेवक पद्मश्री गिरीशकाका प्रभुणे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, वंचित आणि उपेक्षित समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्यासाठी अशा आत्मीय उपक्रमांची नितांत गरज आहे. विशेषतः तत्वम फाउंडेशनच्या माध्यमातून सुशिक्षित तरुण वर्ग एकत्र येऊन सामाजिक जबाबदारीचे भान जपत असल्याबद्दल त्यांनी विशेष समाधान व्यक्त केले, तसेच हे सेवाकार्य अविरत सुरू ठेवण्याचे आवाहन केले. तत्वम सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष रवींद्र ठिकेकर म्हणाले की, सणांचा खरा आनंद हा समाजातील दुर्लक्षित व वंचित घटकांसोबत वाटून घेण्यातच असतो. या चिमुकल्यांच्या चेहऱ्यावरील हास्य हीच आमच्या सामाजिक कार्याची खरी ताकद असून, त्यांच्याशी जोडलेली ही नात्यांची आणि विश्वासाची वीण अधिक घट्ट करण्याचा आमचा निरंतर प्रयत्न राहील. या भावूक सोहळ्यानंतर सर्व 350 मुलांसाठी अत्यंत प्रेमाने आणि तृप्तीने भरवलेल्या स्नेहभोजनाने (अन्नदान) मुलांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हसू फुलवले. या हृदयस्पर्शी उपक्रमासाठी तत्वम सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष रवींद्र ठिकेकर, यांच्यासह सचिव वंदना चौहान, खजिनदार मनीषा पिसाळ यांच्यासह सदस्य आयुष चौहान, संदीप पिसाळ, श्रीराम घाटूळ आणि रजनी मांडले आदींनी विशेष परिश्रम घेतले.



## थोडक्यात पण महत्वाचे

### विशेष मुलांच्या सेवेला 'सार्थक सेवा सन्मान'चा मानाचा मुजरा



**कवठे येमाई: दैनिक संध्या**

विशेष मुलांच्या शिक्षण, संगोपन, प्रशिक्षण आणि सर्वांगीण विकासासाठी गेल्या अनेक वर्षांपासून निस्वार्थ भावनेने कार्यरत असलेल्या आकांक्षा एज्युकेशनल फाउंडेशनच्या उल्लेखनीय सामाजिक कार्याचा 'सार्थक सेवा सन्मान पुरस्कार' देऊन गौरव करण्यात आला.सार्थक संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात हा पुरस्कार उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात प्रदान करण्यात आला. सार्थक संस्थेच्या संस्थापिका व अध्यक्षा स्वाती नामजोशी, कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या सौ. पूनम किर्लोस्कर तसेच श्री. निरंजन किर्लोस्कर यांच्या शुभहस्ते आकांक्षा एज्युकेशनल फाउंडेशनच्या प्रतिनिधींना सन्मानचिन्ह व पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी आकांक्षा फाउंडेशनच्या सेवाभावी कार्याला बळ देण्यासाठी आर्थिक स्वरूपाची मदतही देण्यात आली. विशेष मुलांच्या आयुष्यात शिक्षण, प्रशिक्षण आणि आत्मनिर्भरतेची नवी वाट निर्माण करणाऱ्या संस्थेस मिळालेली ही मदत निश्चितच प्रेरणादायी ठरली आहे. 'आकांक्षा' म्हणजे विशेष मुलांच्या आयुष्यात आशेचा किरण विशेष मुलांमधील क्षमता ओळखून त्यांना योग्य शिक्षण व प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे, त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवणे आणि त्यांना आत्मनिर्भर बनविण्याच्या दिशेने वाटचाल घडवून आणणे, हे आकांक्षा एज्युकेशनल फाउंडेशनचे प्रमुख ध्येय आहे. संस्थेच्या या सातत्यपूर्ण कार्याची समाजाने घेतलेली दखल आणि मिळालेला 'सार्थक सेवा सन्मान' हा केवळ पुरस्कार नसून, विशेष मुलांसाठी काम करणाऱ्या संपूर्ण आकांक्षा परिवाराच्या कार्याला मिळालेली कौतुकाची थाप आहे.या सन्मानामुळे संस्थेच्या पुढील वाटचालीला नवी ऊर्जा, नवी उमेद आणि अधिक जोमाने सामाजिक कार्य करण्याची प्रेरणा मिळाली असून, विशेष मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आकांक्षा फाउंडेशनची सेवा अधिक व्यापक करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

### नेत्रदान जनजागृतीसाठी धावले चारशे डॉक्टर्स आग्रवाल आय रुग्णालयासमोर प्रारंभ

**पिंपळे सौदागर, : दैनिक संध्या**

पुणे जिल्हा अंधत्व नियंत्रण सोसायटी,मेडिफिट फाउंडेशन, आणि रोटरी क्लब ऑफ पुणे स्पोर्ट्स सिटी आणि यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या नेत्रदान जनजागृती मॅरेथॉनमध्ये धावले डॉक्टर्स. नेत्रदान पंधरवड्याच्या निमित्ताने नेत्रदानाबाबत जनजागृती करण्यासाठी पिंपळे सौदागर येथे आयोजित करण्यात आलेल्या विशेष मॅरेथॉनमध्ये सुमारे चारशे डॉक्टरांनी उत्स्फूर्त सहभाग घेत धाव घेतली. पिंपळे सौदागर येथील गोविंद गार्डन चौकाजवळील डॉ. अग्रवाल आय हॉस्पिटलसमोरून मॅरेथॉनला सुरुवात झाली. यावेळी जिल्हा नेत्ररोग शल्यचिकित्सक डॉ. अंजली कुलकर्णी डॉ. सुनील उगिले, डॉ. बबन डोळस यांच्या हस्ते झेंडा दाखवून मॅरेथॉनला प्रारंभ करण्यात आला. कोकणे चौक – रक्षक चौक – औंध रुग्णालय मार्गे पुन्हा डॉ. अग्रवाल आय हॉस्पिटल येथे मॅरेथॉनची सांगता झाली. मॅरेथॉनमध्ये ५ किलोमीटर, १० किलोमीटर आणि २१ किलोमीटर अशा तीन गटांमध्ये धावपटूंनी सहभाग घेतला. डॉक्टरांसह विविध क्षेत्रातील नागरिकांनीही या उपक्रमाला प्रतिसाद दिला. यावेळी पुणे जिल्हा रुग्णालयाच्या जिल्हा नेत्ररोग शल्यचिकित्सक डॉ. अंजली कुलकर्णी,मेडिफिट फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. सुनील उगिले, पीसीएमसी सायकलिस्टचे चिंतामणी माडगुळकर आणि फॅमिली फिजिशियन असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. अजित पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे मुख्य आयोजक डॉ. बबन डोळस यांनी उपस्थितांना नेत्रदान करण्याचे आवाहन केले. "नेत्रदानामुळे एखाद्या व्यक्तीच्या आयुष्यात पुन्हा प्रकाश येऊ शकतो. नेत्रदानाबाबत जनजागृती करण्यासाठी डॉक्टरांनी स्वतः पुढाकार घेणे आणि समाजासमोर आदर्श निर्माण करणे गरजेचे आहे," असे त्यांनी सांगितले. समाजात नेत्रदानाबाबत जागरूकता निर्माण करण्याबरोबरच नागरिकांना नेत्रदानाचा संकल्प करण्याचे आवाहन या माध्यमातून करण्यात आले.नेत्रदानाचा संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी अशा जनजागृतीपर उपक्रमांची आवश्यकता असल्याचे उपस्थित मान्यवरांनी यावेळी सांगितले.

# संस्थास्तरीय विज्ञान प्रदर्शनात शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचे उल्लेखनीय यश!

■ सासवड (दै. संध्या)

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शिवाजी इंग्लिश मिडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, सासवड येथील विद्यार्थी व शिक्षकांनी संस्थास्तरीय विज्ञान प्रदर्शनात उल्लेखनीय कामगिरी करत संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड यांचे वतीने संस्थांतर्गत विज्ञान प्रदर्शन 2026 चे आयोजन शनिवार दि . 29/ 08/ 2026 रोजी श्री शिवाजी इंग्लिश मिडयम स्कूल सासवड (सी . बी . एस . ई . )या ठिकाणी करण्यात आले होते. या विज्ञान प्रदर्शनात संस्थेच्या एकत्रितपणे 19 शैक्षणिक शाखांमधून विज्ञान आणि गणित विषयक 69 प्रकल्पांचे सादरीकरण झाले . सदर स्पर्धा पाच गटांमध्ये आयोजित करण्यात आली होती. विज्ञान, तंत्रज्ञान,



सर्जनशीलता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि नाविन्यपूर्ण विचारसरणीचे दर्शन घडविणाऱ्या या विज्ञान प्रदर्शनात शाळेने विविध गटांमध्ये उत्कृष्ट यश संपादन केले.

सर्वोत्कृष्ट कामगिरीचा मान : या यशात आणखी एक मानाचा तुरा म्हणजे शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, सासवड यांना संस्थास्तरीय विज्ञान प्रदर्शनातील 'सर्वोत्कृष्ट एकूण कामगिरी' (Overall Achievement) ट्रॉफी प्राप्त झाली. या उल्लेखनीय यशामागे विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन, नाविन्यपूर्ण विचार, संघभावना आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांचा मोलाचा वाटा आहे. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी तसेच विज्ञानातील विविध संकल्पना प्रत्यक्ष प्रयोग व नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या माध्यमातून समजून घेण्यासाठी विज्ञान विभागाकडून सातत्याने प्रयत्न केले जात आहेत.

या यशासाठी विद्यालयाचे प्राचार्य डॉ.अभिजीत टकले सर, उपप्राचार्य सौ. सुषमा रासकर मॅडम, विज्ञान विभागाच्या विभागप्रमुख श्रीमती उज्वला डी. जगताप यांचे विशेष कौतुक करण्यात आले. त्यांचे मोलाचे मार्गदर्शन, सातत्यपूर्ण सहकार्य आणि प्रोत्साहन यामुळे विद्यार्थ्यांना आपल्या कल्पना प्रभावीपणे मांडण्यास आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यास प्रेरणा मिळाली.

शाळेचे व्यवस्थापन, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व संपूर्ण शालेय परिवाराने सर्व यशस्वी विद्यार्थी, श्रीमती शिल्पा कुलकर्णी, विज्ञान विभाग तसेच या यशासाठी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष योगदान देणाऱ्या सर्वांचे अभिनंदन केले. संस्थास्तरीय विज्ञान प्रदर्शनातील हे यश शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, सासवडसाठी अभिमानाचा क्षण असून, विद्यार्थ्यांना विज्ञानाच्या क्षेत्रात सतत नवनिर्मिती, संशोधन आणि उत्कृष्टतेचा ध्यास घेण्यासाठी प्रेरणा देणारे आहे.

**प्रदर्शनातील उल्लेखनीय यश**

**शिक्षक गट :**
शाळेच्या श्रीमती शिल्पा कुलकर्णी यांनी प्रथम क्रमांक पटकावून संस्थेचा गौरव वाढविला.
**गट – १ :**
अर्जुन विजय भोसले याने द्वितीय क्रमांक मिळविला.
**गट – २ :**
राजवीर स्मिता संभाजी जगताप याने द्वितीय क्रमांक पटकाविला.
**गट – ४ :**
स्वयम भिसे व आर्यन भोंगले यांनी द्वितीय क्रमांक मिळविला.

## बार्शी तालुक्यात दुष्काळसदृश परिस्थिती; शेतकऱ्यांच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करा - आमदार दिलीप सोपल

आमदार सोपलांचे मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्र्यांसह मंत्र्यांना पत्र; नुकसानभरपाई, कर्ज पुनर्गठन व विशेष पॅकेजची मागणी

■ बार्शी (दै. संध्या)

पावसाच्या प्रदीर्घ खंडामुळे बार्शी तालुक्यात निर्माण झालेल्या गंभीर दुष्काळसदृश परिस्थितीची तातडीने दखल घेऊन नुकसानग्रस्त शेतपिकांचे वस्तुनिष्ठ पंचनामे करावेत आणि पात्र शेतकऱ्यांना शासनाकडून आर्थिक मदत व आवश्यक सवलती द्याव्यात,अशी मागणी आमदार दिलीप सोपल यांनी केली आहे. याबाबत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे तसेच मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव यांच्याकडे पत्राद्वारे मागणी केली आहे. बार्शी



तालुक्यात यंदा अपेक्षित पाऊस झालेला नसून पावसाच्या प्रदीर्घ खंडामुळे खरीप पिकांची अवस्था गंभीर झाली आहे. जमिनीतील ओलावा कमी झाल्याने सोयाबीन, तूर, मूग, उडीद, मका, बाजरी यासह विविध पिकांची वाढ खुंटली असून अनेक ठिकाणी पिके कोमेजून वाळण्याच्या अवस्थेत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीपूर्व मशागत, बियाणे, खते, कीटकनाशके, मजुरी व डिझेलवर केलेला खर्च वाया जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांनी कर्ज काढून व उधार-उसनवारी करून पेरणी केली असताना उत्पादनाचीच शक्यता कमी झाल्याने कर्जफेड, कुटुंबाचा उदरनिर्वाह आणि पुढील हंगामाच्या खर्चाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे महसूल व कृषी विभागाच्या संयुक्त पथकांमार्फत गावनिहाय व पिकनिहाय प्रत्यक्ष पाहणी करून सर्वसमावेशक पंचनामे करावेत, अशी मागणी सोपल यांनी केली. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाच्या निकषांनुसार तातडीने पीक नुकसानभरपाई द्यावी, पीक कर्जाचे पुनर्गठन व मुदतवाढ द्यावी, पुढील हंगामासाठी बियाणे व कृषी निविष्ठांसाठी विशेष मदत करावी, तसेच पूर्णपणे नुकसान झालेल्या भागाचा दुष्काळसदृश परिस्थिती म्हणून स्वतंत्रपणे विचार करून विशेष पॅकेज जाहीर करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

# बारामती नगर परिषदेच्या विकासात्मक कामासाठी निधी कमी पडू देणार नाही

### खासदार पार्थदादा पवार यांची स्पष्टोक्ती

■ बारामती (दै. संध्या)

बारामती नगर परिषदेच्या वाढीव हद्दवाढीतील नगरसेवकांची प्रभागातील विकास कामा संदर्भात खासदार पार्थदादा पवार यांनी बैठक आयोजित केली होती.

त्यावेळी प्रभाग क्रमांक १८ मधील सर्व सर्वसाधारण मिटींगमध्ये मंजूर केलेल्या कामांना नगराध्यक्ष सचिनशेठ सातव तसेच मुख्याधिकारी पंकज भुसे यांना सदरील कामे लवकरात लवकर चालू करणेबाबत सुचना केल्या. विकासात्मक कामांच्या अनुषंगाने मंजूर प्रलंबित रिंग रोड अंतर्गत रस्ते,मुख्य रस्त्यासह प्रभागातील ड्रेनेज लाईन,रस्ता रुंदीकरण, डांबरीकरण रस्तेसह सिमेंट कॉक्रीटीकरण रस्ते,स्ट्रीट लाईट,हायमॉस लाईट,पाण्याच्या चारीमध्ये सिमेंट वॉल कंपाऊंड करणे,मंजूर सामाजिक भवन,धार्मिक मंदिरे,विविध ठिकाणी सुशोभीकरण करणे, अण्णाभाऊ साठे नगर येथील झोपडपट्टी पुनर्वसन व निर्मूलन करणे,संपूर्ण प्रभागात वृक्षारोपण,तसेच नगर परिषदेच्या शाळा



दुरुस्तीसह शालेय पोषण साहित्यासाठी जातीने लक्ष घालून कामे तातडीने मार्गी लावण्यासाठी संबंधितांना आदेश देण्यात आले. तसेच पुर्णात्वास असलेल्या विश्वकर्मा सामाजिक भवनाचे उद्घाटन व मंजूर कामांचे भूमिपूजन करणेबाबत सकारात्मक चर्चा होवुन नगराध्यक्ष सचिनशेठ सातव तसेच संबंधित अधिकारी यांना तातडीने कामाची कार्यवाही करण्यासाठी सुचना करण्यात आल्या.

बारामती नगर परिषदेच्या विकासात्मक कामासाठी १८००/-कोटी पेक्षा निधी मंजूर करण्यात आला असून प्रभागातील विकास कामांसाठी निधी कमी पडू देणार नाही असे खासदार पार्थदादा पवार यांनी स्पष्टोक्ती दिली. यावेळी प्रभाग क्रमांक१८मधील विकासात्मक कामांबाबत नगरसेवक श्री.राजेंद्र (नाना)सोनवणे व नगरसेविका अश्विनी सातव यांनी प्रभागातील विकासात्मक कामे लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी स्पष्ट भुमिका मांडली त्याला खासदार पार्थदादा पवार यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला,यावेळी मा.नगरसेवक सुरज सातव उपस्थित होते.

नगराध्यक्ष सचिनशेठ सातव मुख्याधिकारी पंकज भुसे यांना प्रशासकीय कार्यवाही लवकरात लवकर पुर्ण करुन विकासात्मक कामे जलद गतीने पूर्ण करण्याच्या सुचना व आदेश देण्यात आले.

# विकासकामांचा खासदार पवार यांनी घेतला आढावा

■ बारामती (दै. संध्या)

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते तथा खासदार श्री. पार्थ अजितदादा पवार आज बारामती दौऱ्यावर होते. यावेळी त्यांची भेट घेण्यासाठी नागरिक तसेच पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली होती.

खासदार श्री. पार्थ पवार यांनी उपस्थित नागरिक, पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या भेटी घेत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. नागरिकांनी सादर केलेली विविध निवेदने स्वीकारून संबंधित प्रश्नांवर योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

तसेच बारामती मतदारसंघातील विविध विकासकामे, प्रलंबित प्रश्न आणि नागरिकांशी संबंधित विषयांचा त्यांनी विविध विभागांच्या अधिकाऱ्यांसोबत बैठका घेऊन आढावा घेतला. संबंधित कामांना गती देण्याबरोबरच नागरिकांच्या प्रश्नांची तातडीने दखल घेऊन त्यांचे निराकरण करण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

दरम्यान, बारामती शहर व परिसरातील कायदा व सुव्यवस्था



अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासनासोबतही त्यांनी आढावा घेतला. नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत कायदा व सुव्यवस्था व्यवस्थित राखण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या महत्त्वपूर्ण सूचना खासदार श्री. पार्थ पवार यांनी पोलीस प्रशासनाला दिल्या.

नागरिकांच्या अडचणी जाणून घेऊन त्या सोडविण्यासोबतच बारामतीच्या सर्वांगीण विकासासाठी प्रशासनाशी समन्वय साधून काम करण्यावर खासदार पार्थ पवार यांनी यावेळी भर दिला.



## उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्याकडून विविध विकासकामांची पाहणी

■ बारामती (दै. संध्या)

उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज सकाळी बारामती परिसरातील विविध विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी करून कामांच्या प्रगतीचा आढावा घेतला. बारामती येथील जिल्हा क्रीडा संकुल राज्यातील युवा खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्तरावर झेप घेण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल ठरेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. विकासकामे निर्धारित वेळेत, नियोजनबद्ध पद्धतीने आणि गुणवत्तापूर्णरीत्या पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकारी व यंत्रणांना दिल्या. उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी सकाळी ६ वाजता जिल्हा क्रीडा संकुलाच्या नवीन इमारतीच्या बांधकामाची पाहणी केली. तब्बल २.९६ एकर परिसरात ३४ कोटी ६७ लाख ७ हजार ४३३ रुपये खर्चून उभारण्यात येत असलेले हे क्रीडा संकुल खेळाडूंना अत्याधुनिक सुविधा आणि उत्तम क्रीडा वातावरण उपलब्ध करून देणारे ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले.

■ युवा खेळाडूंना आंतरराष्ट्रीय स्तरावर झेप घेण्यासाठी क्रीडा संकुल महत्त्वपूर्ण पाऊल ठरेल – उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

या संकुलात २८ कार आणि ७१ दुचाकींसाठी पार्किंग व्यवस्था, वेटिंग हॉल, कार्यालय, कॉन्फरन्स हॉल, बॉक्सिंग हॉल, जिम्नॅशियम, झुंबा व एरोबिक्स हॉल, महिला व पुरुषांसाठी थेरपी एरिया यांसह फुटबॉल, टेनिस, बॅडमिंटन, व्हॉलिबॉल, ज्युडो, रेसलिंग, कराटे, टेबल टेनिस आणि शूटिंग रेंज अशा विविध क्रीडा सुविधांचा समावेश आहे. तसेच विविध क्रीडा उपक्रम आणि स्पर्धांसाठी मल्टीपर्पज हॉल उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

बारामतीसह संपूर्ण पुणे जिल्ह्यातील खेळाडूंना सराव, प्रशिक्षण आणि स्पर्धांसाठी दर्जेदार व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हे क्रीडा संकुल महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे सांगून उर्वरित कामे नियोजित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी केल्या. कामाच्या गुणवत्तेवर विशेष लक्ष देऊन सुविधा दीर्घकाळ टिकतील, याची दक्षता घेण्याचे निर्देशही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

यावेळी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केलेल्या कु. जानवी वीरकर या युवा खेळाडूचा तसेच कबड्डी प्रशिक्षक दादासो आव्हाड यांचा उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. बारामती परिसरातील खेळाडूंना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाच्या माध्यमातून करण्यात येत असलेल्या विविध प्रयत्नांची माहितीही यावेळी देण्यात आली.




## माणिक चंदर देवकर यांना 'गुणवंत क्रीडा संघटक पुरस्कार'

■ कोरेगावमुळ,(दै. संध्या)

माणिक चंदर देवकर यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत आपल्या कर्तृत्वाची आणि जिद्दीची छाप उमटवत उच्च पदापर्यंत झेप घेतली.

क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी सातत्याने योगदान देणारे तसेच खेळाडू, क्रीडा शिक्षक आणि क्रीडाप्रेमींच्या सदैव पाठीशी उभे राहणारे पुणे महानगरपालिका शिक्षण विभागाचे क्रीडा विभागप्रमुख माणिक चंदर देवकर यांना त्यांच्या क्रीडा क्षेत्रातील बहुमोल योगदानाबद्दल 'गुणवंत क्रीडा संघटक पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद, पुणे यांच्या वतीने २९ ऑगस्ट राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले सभागृह, पुणे येथे हा विशेष पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता.

जिल्हा क्रीडा अधिकारी, पुणे जगन्नाथ लकडे यांच्या हस्ते माणिक चंदर देवकर यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. या पुरस्कार सोहळ्यास अर्जुन पुरस्कार विजेते शांताराम बापू जाधव, महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचे सरचिटणीस नामदेव शिरगांवकर, माजी जिल्हा क्रीडा अधिकारी, रायगड लाड, आंतरराष्ट्रीय खेळाडू धनंजय मदने, दादासो देवकाते, शिवाजी कोळी, विकास काटे, श्रीपाद जगताप, विजय गांगर्डे यांच्यासह विविध क्रीडा अधिकारी, पदाधिकारी, राष्ट्रीय व राज्यस्तरीय खेळाडू तसेच पुणे जिल्ह्यातील क्रीडा शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सान्वी महाडीकची पुण्यात बाजी; स्वलिखित नाट्यछटेने विभागीय अंतिम फेरीत द्वितीय क्रमांक

■ बारामती (दै. संध्या)

बाल रंगभूमी परिषद आयोजित स्व. मनीषाताई भाऊसाहेब भोईर नाट्यछटा स्पर्धा २०२६ च्या पुणे येथे पार पडलेल्या विभागीय अंतिम फेरीत विद्या प्रतिष्ठानच्या न्यू बाल विकास मंदिर, पिंपळी येथील इयत्ता आठवीची विद्यार्थिनी सान्वी अमरेन्द्र महाडीक हिने इयत्ता ८ वी व ९ वीच्या गटात द्वितीय क्रमांक पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले. विशेष म्हणजे, सान्वीने सादर केलेली 'माझा डाएट उद्यापासून सुरू' ही नाट्यछटा तिची स्वतःची लेखनकृती असून, स्वलिखित नाट्यछटेच्या प्रभावी सादरीकरणातून तिने हे यश मिळवले आहे.

सान्वीच्या या उल्लेखनीय यशाची दखल घेत महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा विद्या प्रतिष्ठानच्या विश्वस्त सुनेत्राताई पवार यांनी तिचे विशेष अभिनंदन केले. सान्वीने आपल्या कलागुणांच्या जोरावर शाळेसह बारामतीचे नाव उज्ज्वल केल्याबद्दल त्यांनी तिचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेच्या विविध २६ केंद्रांवर २,५०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. त्यातून सुमारे २६० विद्यार्थी अंतिम फेरीपर्यंत पोहोचले. विविध गटांतील




गुणवंतांना एकूण ६४ पारितोषिके प्रदान करण्यात आली. सान्वी सहभागी असलेल्या इयत्ता ८ वी व ९ वीच्या गटात तब्बल ४६५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. अशा अत्यंत चुरशीच्या गटातून अंतिम फेरीत मजल मारत सान्वीने आपल्या उत्कृष्ट सादरीकरणाच्या जोरावर द्वितीय पारितोषिकावर आपले नाव कोरले. दैनंदिन जीवनातील 'डाएट' या विषयाकडे विनोदी आणि मिश्कील नजरेने पाहणारी 'माझा डाएट उद्यापासून सुरू' ही नाट्यछटा सान्वीने स्वतः लिहिली. विषयाची कल्पक मांडणी, सहज संवादफेक, आत्मविश्वासपूर्ण अभिनय आणि विनोदाचे अचूक टायमिंग यामुळे तिच्या सादरीकरणाने परीक्षकांसह उपस्थितांची मने जिंकली. लेखन आणि अभिनय या दोन्ही पातळ्यांवर स्वतःची प्रतिभा सिद्ध केल्यामुळे सान्वीचे हे यश विशेष ठरले आहे. अंतिम फेरीसाठी आकाश थिटे, निकिता वाणी, स्वप्नील खंबायत, चैताली जाधव आणि प्रीती केसकर यांनी परीक्षक म्हणून जबाबदारी पार पाडली.




दैनिक
संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



## थोडक्यात पण महत्वाचे

### ६०० हून अधिक भाऊ-बहिणी रक्षाबंधनानिमित्र एकत्र

मुंबई : मुंबई शहर आणि उपनगरातील विविध ३९ बालगृहांमध्ये राहणाऱ्या ६०० हून अधिक भाऊ-बहिणींना 'टीम अवर चिल्ड्रन्स'ने रक्षाबंधनानिमित्त एकत्र आणले. सायन येथील श्री मानव सेवा संघ येथे रक्षाबंधन उत्साहात झाले. बालगृहांमध्ये आश्रय घेणाऱ्या बालकांसाठी हा सोहळा केवळ सण साजरा करण्यापुरता मर्यादित न राहता, भावंडांमधील प्रेम, आपुलकी आणि कौटुंबिक जिव्हाळा अनुभवण्याचा अनोखा क्षण ठरला. विविध बालगृहांमधून आलेली भावंडे एकमेकांना भेटताच त्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्साह दिसून आला. या उपक्रमाच्या माध्यमातून बालकांना प्रेम, सुरक्षितता, आपलेपणा आणि एकमेकांच्या सहवासाची जाणीव अनुभवता आली. भावंडांनी एकमेकांना रक्षाबंधनाच्या शुभेच्छा देत हा दिवस आनंदात साजरा केला. 'टीम अवर चिल्ड्रन्स'च्या या उपक्रमामुळे बालकांना कौटुंबिक जिव्हाळ्याच्या भावनेचा अनुभव मिळाला. बालकांच्या चेहऱ्यावर उमटलेले हास्य आणि आनंद हाच या सोहळ्याचा खरा उद्देश व यश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

### राज्यातील ४०४ नागरिक सुरक्षित; ३३८ जण संपर्कात

मुंबई : नेपाळ येथील महापुरामध्ये अडकलेले महाराष्ट्रातील नागरिक व धार्मिक पर्यटनासाठी गेलेल्या पर्यटकांच्या मदतीसाठी विविध पातळीवर शासकीय यंत्रणा अहोरात्र प्रयत्न करत आहेत. सर्वजण सुरक्षितपणे त्यांच्या गावी परत पोहोचण्यासाठी सतर्कतेने योग्य नियोजन करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. सागा येथून ४१ जण आज परतले असून १०६ जण नागपूरला उद्या पहाटे ४:३० वाजता पोहोचतील. जवळपास १४३ नागरिक राज्यात यशस्वी व सुरक्षितरित्या परतण्याच्या मार्गावर असून नेपाळमध्ये निर्माण झालेल्या पूरस्थितीमुळे महाराष्ट्रातील नागरिकांसाठी हेल्पलाईन क्रमांक जारी करण्यात आले आहेत. मंत्रालयातील नियंत्रण कक्षात २४ तास हा कक्ष कार्यरत असून महाराष्ट्रातील नागरिकांसाठी सहाय्यता व मदतकार्य समन्वय साधला जात आहे. राज्यातील ४५ जणांच्या पर्यटकांच्या ग्रुपने आज भारतीय हद्दीत प्रवेश केला आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर येथील ट्रॅव्हल्सच्या माध्यमातून नाशिक, पुणे, मुंबई व अहिल्यानगर येथील नागरिक नेपाळ येथे गेले होते. महापुराच्या घटनेच्या कालावधीत हे नागरिक चितवन येथे होते. आज काठमांडूकडे जाणारे मार्ग बंद असल्याने नेपाळमधील लुंबिनी मार्गे त्यांना आणण्यात येत असून आज अयोध्या पोहोचल्यानंतर पुढील नियोजन शासनाच्या सूचनेनुसार केले जाणार आहे. आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन सूचनानुसार महाराष्ट्र शासन तसेच केंद्र सरकारच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाच्या माध्यमातून आवश्यक मदत देण्यासाठी कार्यवाही केली जात आहे. आत्तापर्यंत प्राप्त माहितीनुसार राज्यातील ४०४ नागरिक सुरक्षित असून ३३८नागरिकांशी संपर्क झाला आहे.

### 'कलरिंग बुक'चे मंत्री तटकरे यांच्या हस्ते लोकार्पण

मुंबई : न्याय संस्था आणि विधी सेंटर फॉर लीगल पॉलिसी यांच्यावतीने बालकांना त्यांच्या संविधानिक हक्कांची माहिती सहज, आनंददायी पद्धतीने मिळावी, यासाठी 'प्रत्येक बालकाने जाणून घ्यावेत असे 18 मूलभूत हक्क'हे बुक तयार करण्यात आले आहे. या कलरिंग बुकचे लोकार्पण महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्ट्स (एनसीपीए), मुंबई येथे आयोजित कार्यक्रमास मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती भारती डंगरे, माजी न्यायमूर्ती आर. सी. चव्हाण, अनिशा गोपी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी संस्थेच्या वतीने राज्यात संविधान फेलोशिपचाही शुभारंभ करण्यात आला.



# झोपडपट्टीधारकांना मालकी हक्काचे पट्टे देऊन थांबणार नाही

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : 'फूट प्रिंट ऑफ डिग्निटी' पुस्तकाचे प्रकाशन

■ नागपूर (दै. संध्या)

झोपडपट्टीतील रहिवाशांना मोठ्या प्रमाणात मालकी हक्काचे पट्टे देणारे नागपूर हे देशातील एकमेव शहर आहे. मात्र आम्ही फक्त मालकी हक्काचे पट्टे देऊन थांबणार नाही, तर या वसाहतींमध्ये मूलभूत सुविधा देऊन तेथील रहिवाशांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न करीत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

नागपूर शहरातील झोपडपट्टीधारकांना हक्काचे मालकी पट्टे मिळवून देऊन त्यांना सन्मानाने जगता यावे म्हणून मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केलेले प्रयत्न आणि त्याअनुषंगाने झालेले निर्णय या संपूर्ण प्रक्रियेवर सीएफएसडी (सेंटर फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंट) च्या लीना बुद्धे यांनी लिहिलेल्या 'फूटप्रिंट्स ऑफ डिग्निटी : बिल्डिंग टेन्युअर राइट्स इन अर्बन स्लम्स ऑफ इंडिया' या पुस्तकाचे प्रकाशन आज 'रामगिरी' येथे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते.

झोपडपट्टीतील रहिवाशांना मालकीपट्टे मिळणे अतिशय आवश्यक होते. ते दिल्यामुळे त्यांचे जीवन बदलल्याचे सांगून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, त्यांचा सर्वसमावेशक विकास होण्याच्या दृष्टीने आम्ही प्रयत्न करीत आहोत. झोपडपट्टी विकासासाठी हे पुस्तक दिशादर्शक असणार आहे. मी नागपूरचा महापौर असतानाच या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात आले होते.

त्यामुळे पुढे आमदार म्हणूनही हा विषय लावून धरला. या क्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून काम करणाऱ्या या पुस्तकाच्या लेखिका लीना बुद्धे यांनीही हा गुंतागुंतीचा विषय अभ्यासपूर्ण मांडला. मुख्यमंत्री झाल्यानंतर मालकी पट्टे देण्याचा मी निर्णय घेतला. अनेक खासगी जागांवरही झोपडपट्ट्या वसल्या आहेत. त्यांच्या नियमितीकरणासाठीही शासनाने निर्णय घेतला. या संपूर्ण प्रक्रियेचे या पुस्तकामुळे दस्तावेजीकरण झाले आहे असे सांगत मुख्यमंत्र्यांनी लेखिका श्रीमती बुद्धे यांचे अभिनंदन केले.

नागपुरातील झोपडपट्टीधारकांना मालकी हक्काचे पट्टे मिळाले याचे संपूर्ण श्रेय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे असल्याची भावना लेखिका लीना बुद्धे यांनी मनोगतात व्यक्त केली. झोपडपट्टीधारकांचा प्रश्न हा अतिशय जुना आहे. तो फार कोणी समजून घेतला नाही, मात्र मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी त्यासाठी मदतीचा हात पुढे करून ठोस निर्णय घेतले.

त्यामुळे मालकी हक्क मिळण्याचा मोठा आनंद त्या रहिवाशांना मिळू शकला. हा सारा प्रवास या पुस्तकात मांडला आहे. नागपूर शहरात १२ ते १५ हजार अशा मालकीपट्ट्यांचे वाटप करण्यात आले आहे. हे खूप मोठे कार्य असल्याचे लीना बुद्धे यावेळी म्हणाल्या. याप्रसंगी मनपा आयुक्त डॉ. विपीन इटनकर, डॉ. सुहास बुद्धे, सीएफएसडीतील डॉ. बुद्धे यांचे सहकारी आणि त्यांचे आप्त उपस्थित होते.

# रत्नागिरीत २,१५९ कोटींची ऐतिहासिक गुंतवणूक

## पंचतारांकित हॉटेलसाठी १०० कोटींची गुंतवणूक




■ रत्नागिरी (दै. संध्या)

कोकणात उद्योग येत नाहीत हा जुना ठपका पुसून काढत रत्नागिरीच्या स्थानिक उद्योजकांनी औद्योगिक आणि पर्यटन विकासाला नवी गती दिली आहे. 'जिल्हा गुंतवणूक परिषद २०२६' च्या माध्यमातून जिल्ह्यात तब्बल २ हजार १५९ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे सामंजस्य करार करण्यात आले. यामध्ये रत्नागिरीच्या पर्यटन वैभवात भर घालणाऱ्या १०० कोटींच्या पंचतारांकित हॉटेल प्रकल्पासह मोठ्या औद्योगिक प्रकल्पांचा समावेश आहे.

### रोजगार उपलब्ध होणार

या परिषदेला उद्योग विभागाचे सहआयुक्त संदीप पाटील, अप्पर जिल्हाधिकारी मिनाक्षी कुंभार, एमआयडीसीच्या प्रादेशिक अधिकारी वंदना खरमाळे, प्रांताधिकारी जीवन देसाई, सहायक आयुक्त अजिंक्य अजगेकर, एमआयडीसी फेडरेशनचे प्रशांत पटवर्धन, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष विलास चाळके, माजी नगराध्यक्ष राहुल पंडित, उद्योजक राजेश सावंत, राज आंब्रे यांच्यासह जिल्ह्यातील उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सहायक आयुक्त अजिंक्य अजगेकर यांनी आभार मानले. जिल्हा गुंतवणूक करार – आज दि.30 ऑगस्ट 2026 पर्यंत महाराष्ट्रातील 17 जिल्ह्यांत 1837 गुंतवणूक करारांद्वारे 82655 कोटींची गुंतवणूक झाली असून, 1,55,389 जणांना याद्वारे रोजगार उपलब्ध होणार आहे.

जिल्ह्यातील पर्यटन आणि आदरातिथ्य (हॉस्पिटॅलिटी) क्षेत्राला बळ देण्यासाठी महत्त्वाच्या घोषणा करण्यात आल्या: एक्सप्रेस ग्रुपची १०० कोटींची गुंतवणूक : विमानतळापासून २ किमी, शहरापासून ३ किमी आणि समुद्रापासून अवघ्या १ किमी अंतरावर एमआयडीसीच्या जागेत एक्सप्रेस ग्रुप पंचतारांकित हॉटेल उभारणार आहे. जयगड येथे महिंद्रांचे फाईव्ह स्टार हॉटेल : जयगड येथे उभारण्यात येत असलेल्या आनंद महिंद्रा यांच्या पंचतारांकित हॉटेलचे ९० टक्के काम पूर्ण झाले असून ते लवकरच उद्घाटनासाठी सज्ज होत आहे.

विमानसेवा लवकरच सुरू : रत्नागिरी विमानतळाचे ९० टक्के काम पूर्ण झाले असून डिसेंबर ते जानेवारीच्या पहिल्या आठवड्यापर्यंत 'एटीआर' (ATR) प्रवासी विमान उड्डाण घेईल. कार्यक्रमात बोलताना उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत म्हणाले, "रत्नागिरीचा जीडीपी गेल्या २० वर्षांच्या तुलनेत कित्येक पटीने वाढला असून, यात स्थानिक उद्योजक, व्यापारी आणि दुकानदारांचा मोठा वाटा आहे. स्थानिक उद्योजकांनी पुढाकार घेत २,१५९ कोटींची गुंतवणूक केली आहे. हे सर्व प्रकल्प १०० टक्के पूर्ण करून पुढील वर्षी ५ हजार कोटींच्या गुंतवणुकीचा नवा संकल्प आपण पूर्ण करू." जिल्ह्यात रोजगारनिर्मितीसाठी मोठ्या प्रकल्पांची घोषणा यावेळी करण्यात आली: स्टील उद्योग : येत्या ७, ८ आणि ९ तारखेला जिल्ह्यात स्टील उद्योगाचा मार्ग मोकळा होत असून, यामुळे किमान १० ते १२ हजार स्थानिकांना रोजगार मिळेल. सेमीकंडक्टर प्रकल्प : 'व्हीआयटी'कडून जमीन काढून ती 'आरआरपी' (RRP) या सेमीकंडक्टर कंपनीला दिली जात आहे. प्रदूषणमुक्त एमआयडीसी : निवेंडी, वाटद आणि मेर्वी येथे नव्या प्रदूषण विरहित एमआयडीसी उभारल्या जात आहेत. 'मिलाप' ॲप आणि 'मैत्री' पोर्टलद्वारे पारदर्शक सेवा उद्योगांसाठी एमआयडीसीची जागा मिळवण्यासाठी 'मिलाप' (Milap) ॲप सुरू करण्यात आले असून सोमवारी वैध अर्ज केल्यास पुढच्या सोमवारी घरबसल्या थेट ऑफर लेटर मिळेल. तसेच 'मैत्री' (Maitri) पोर्टलवर अर्ज केल्यास ३० दिवसांत दाखला मिळणे

# कामांना नव्या 'टाइमलाईन'ने गती द्या : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

■ नागपूर(दै. संध्या)

हिंदूहृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी उद्यानाचा नियोजनबद्ध आणि सर्वांगीण विकास करण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गोरेवाडा प्रकल्पाची पाहणी करून विविध कामांचा सविस्तर आढावा घेतला. आफ्रिकन सफारी सुरू करण्यासाठी सुरू असलेल्या कामांची सद्यस्थिती, प्रकल्पाची प्रगती आणि सफारी सुरू करण्याचे अपेक्षित वेळापत्रक याबाबत त्यांनी अधिकाऱ्यांकडून माहिती जाणून घेतली. गोरेवाड्यात सुरू असलेल्या सर्व कामांसाठी नव्याने स्पष्ट कालमर्यादा निश्चित करून त्यानुसार कामांना गती देण्याचे निर्देश त्यांनी दिले.

गोरेवाडा येथील वन्यजीव संशोधन व प्रशिक्षण केंद्रातील वसंतराव नाईक प्रशासकीय इमारतीत आज आयोजित आढावा बैठकीला वनमंत्री गणेश नाईक, खासदार माया इनवाते, वनविभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, प्रधान मुख्य वन संरक्षक(वनबल प्रमुख) एम. श्रीनिवास राव, विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, पोलीस अधीक्षक ग्रामीण हर्ष पोद्दार, वाईल्डलाइफ रेस्क्यू व ट्रेनिंग सेंटरचे संचालक शिरीष उपाध्ये, अपर जिल्हाधिकारी प्रवीण महिरे, विभागीय व्यवस्थापक तथा प्राणीसंग्रहालय संचालक पांडुरंग पाखले यांच्यासह वनविभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी गोरेवाडा प्रकल्पातील विविध कामांची माहिती घेताना संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली. आफ्रिकन सफारी हा गोरेवाडा प्रकल्पाच्या दृष्टीने महत्त्वाचा भाग असून, त्यासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा आणि अन्य कामांची पूर्तता कोणत्या टप्प्यावर आहे, याची माहिती त्यांनी जाणून घेतली. आफ्रिकन सफारी सुरू करण्यासाठी आवश्यक असलेली कामे निश्चित करून त्यांची पूर्तता कालबद्ध पद्धतीने करण्यावर भर देण्याचे निर्देश त्यांनी दिले.

वनविभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर यांनी गोरेवाडा प्रकल्पाची आतापर्यंतची वाटचाल, प्रकल्पाची सद्यस्थिती आणि सुरू असलेल्या विविध कामांची माहिती सादरीकरणाद्वारे दिली. सादरीकरणात देण्यात आलेल्या माहितीनुसार, गोरेवाडा प्रकल्पाचा पहिला टप्पा २०२१ मध्ये पूर्ण करण्यात आला आहे. या टप्प्यात वाइल्डलाइफ रेस्क्यू सेंटर, इंडियन सफारी आणि एंट्रन्स प्लाझा यांचा समावेश आहे. पहिल्या टप्प्यातील ही कामे पूर्ण झाल्यानंतर गोरेवाडा प्रकल्पाच्या पुढील विकासासाठी दुसऱ्या आणि तिसऱ्या टप्प्यातील विविध सुविधांचे नियोजन करण्यात आले आहे. आफ्रिकन सफारीसह महत्त्वाची कामे प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात समाविष्ट आहेत. वॉकिंग ट्रेल, आफ्रिकन सफारी, सफारी प्लाझा, ॲनिमल हॉस्पिटल आणि क्वारंटाईन ब्लॉक यांचा समावेश असल्याची माहिती सादरीकरणाद्वारे देण्यात आली. यातील आफ्रिकन सफारीच्या कामाच्या प्रगतीबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांनी विशेष माहिती जाणून घेतली.

### विकासासाठी अनुभवी आणि सक्षम सल्लागाराची नियुक्ती

प्रकल्पाच्या पुढील विकासासाठी अनुभवी आणि सक्षम सल्लागाराची नियुक्ती करावी, असे निर्देशही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिले. गोरेवाड्याचा विकास करताना दीर्घकालीन पर्यटनाच्या गरजा लक्षात घेऊन नियोजन करण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली. ताडोबा आणि पेंच येथे येणाऱ्या पर्यटकांनी गोरेवाड्यात एक ते दोन दिवस पर्यटनासाठी घालवावेत, या दृष्टीने गोरेवाड्याचा विकास करण्याची गरज मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली. ताडोबा आणि गोरेवाडा या दोन्ही पर्यटनस्थळांना जोडणारे प्रभावी नियोजन करून पर्यटकांचा मुक्काम वाढेल, अशा पद्धतीने सुविधा विकसित करण्याची सूचना त्यांनी केली. गोरेवाडा प्रकल्पात वन्यजीव पर्यटनासोबत पर्यटकांना विविध अनुभव देणाऱ्या सुविधा विकसित करून विदर्भातील महत्त्वाचे पर्यटन केंद्र म्हणून गोरेवाड्याची ओळख निर्माण करण्यासाठी नियोजन करावे, असेही त्यांनी सांगितले.

# समृद्धी महामार्गावरील टाकळीवाडी येथे गॅस वाहिनीला गळती

■ छत्रपती संभाजीनगर, (दै. संध्या)

समृद्धी महामार्गालगत टाकळीवाडी (ता. गंगापूर) येथे गेल कंपनीच्या गॅस वाहिनीला गळती लागली असून खबरदारीचा उपाय म्हणून समृद्धी महामार्गावरील साखळी क्रमांक ४४७ ते ४७० दरम्यानची (३० किमी अंतर-हडस पिंपळ गाव ते माळीवाडा) वाहतूक धुळे – सोलापूर महामार्गावरून वळविण्यात आली आहे, असे जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी कळविले आहे.

आज सायं. ५ वा. सुमारास टाकळीवाडी येथे गेल कंपनीच्या गॅस वाहिनीला गळती लागली. या घटनेची प्रशासनाने तात्काळ दखल घेत, त्वरित उपाययोजना सुरु केल्या. घटनास्थळी तात्काळ गेल कंपनीच्या अधिकाऱ्यांना पाचरण करण्यात आले. तसेच अग्निशमन यंत्रणा सज्ज करण्यात आली.तथापी, खबरदारी म्हणून समृद्धी महामार्गावरील साखळी क्रमांक ४४७ ते ४७० दरम्यान ३० किमी वरील वाहतूक धुळे – सोलापूर महामार्गावरून वळवण्यात आली आहे. मुंबईकडून जाणारी वाहने हे हडस पिंपळगाव इंटरचेंजवरून उतरून धुळे – सोलापूर महामार्गावर जातील व माळीवाडा येथून पुन्हा समृद्धी महामार्गावर येतील. नागपूरकडून येणारी वाहने माळीवाडा इंटरचेंजवरून धुळे – सोलापूर महामार्गावर येतील व हडस पिपंळगाव येथून पुन्हा समृद्धी महामार्गावर येतील. रहदारी धुळे – सोलापूर महामार्ग वरून वळविण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला असल्याचे जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी सांगितले. दरम्यान गेल कंपनीच्या तज्ज्ञांनी दोन्हीही बाजूकडील व्हॉलव्ह बंद केले असून पाईपलाईन मधील दाब कमी होत आहे. लवकरच रहदारी सुरळीत होईल, यासाठी प्रशासन अथक प्रयत्न करीत असून जिल्हाधिकारी व पोलीस दलाचे वरिष्ठ अधिकारी लक्ष ठेवून आहेत. अधिक माहितीसाठी समृद्धी महामार्ग नियंत्रण कक्ष क्रमांक 1800 233 22 33 व 8181818155 वर संपर्क साधता येईल, असेही कळविण्यात आले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### हेन्कल अधेसिव्ह कंपनीच्या वतीने कडेपठार घनवनासाठी ट्रीगार्ड

**जेजुरी : दैनिक संध्या**

30 तीर्थक्षेत्र श्री कडेपठार (मुळस्थान) जेजुरी गडावर श्री खंडोबा देवता व लिंग कडेपठार ट्रस्ट, जेजुरी संकल्पित "कडेपठार घनवन प्रकल्प" अंतर्गत गडावर करण्यात आलेल्या वृक्षारोपनाचे वृक्षसंवर्धन करण्यासाठी हेन्कल अधेसिव्ह कंपनीच्या वतीने वृक्षारोपण करून ५० ट्रीगाईस भेट देण्यात आले. यावेळी अॅड मंगेश जेजुरीकर यांनी "कडेपठार घनवन प्रकल्पा अंतर्गत लावण्यात आलेल्या २५०० वृक्ष लागवडींविषयी माहिती देऊन हेंकल कंपनीचे डॉ प्रसाद खंडागळे यांच्या पुढाकारातून सीएसआर योजनेतून योगदान केल्याचे सांगितले. यावेळी डॉ. प्रसाद खंडागळे.प्रकाश खाडे, हीना परवीन, विशाल कापरे, गणेश बारभाई, रामदास चव्हाण कडेपठार देवस्थानचे विश्वस्त मयूर दिडभाई, गणेश भंडलकर, वनरक्षक धनंजय देवकर, पुष्कर खाडे, आदी उपस्थित होते.

### आळंदीत फेरीवाल्यांच्या मागण्यांसाठी आंदोलनाचा इशारा

**आळंदी: दैनिक संध्या**

नगरपरिषद हद्दीतील फेरीवाले व पथविक्रेत्यांना ओळखपत्र, विक्री परवाना देण्यासह बायोमेट्रिक सर्वेक्षण पूर्ण करण्याच्या मागणीसाठी फेरीवाला हॉकर्स महासंघाने आंदोलनाचा इशारा दिला आहे. मागण्या मान्य न झाल्यास गुरुवारी (ता. ३) नगरपरिषदेसमोर लाक्षणिक उपोषण करण्यात येणार असल्याचे महासंघाने स्पष्ट केले. याबाबत महासंघाचे उपाध्यक्ष मल्हार काळे यांनी जिल्हाधिकारी व प्रांताधिकाऱ्यांना निवेदन दिले. काळे म्हणाले, "आळंदी नगरपरिषद हद्दीतील फेरीवाले व पथविक्रेत्यांना अद्याप ओळखपत्र व विक्री परवाना देण्यात आलेला नाही. तसेच त्यांच्या व्यवसायासाठी जागाही निश्चित करण्यात आलेली नाही. 'प्रधानमंत्री पथविक्रेता' या नावाची ओळखपाटीही देण्यात आलेली नाही." भाडे धोरण आणि बायोमेट्रिक सर्वेक्षणाबाबत माहितीच्या अधिकारात माहिती मागूनही नगरपरिषदेकडून योग्य माहिती दिली जात नसल्याचा आरोप त्यांनी केला. पथविक्रेत्यांसाठी स्पष्ट धोरण निश्चित करून बायोमेट्रिक सर्वेक्षण करावे आणि माहिती अधिकारातील मागितलेली माहिती द्यावी, या मागणीसाठी हे आंदोलन करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, जाणीव संघटनेचे सुलतानभाई शेख यांनी भाजी मंडईतील अतिक्रमण कारवाईवर आक्षेप घेत महिला विक्रेत्यांना हक्काची जागा उपलब्ध करून देण्याची मागणी केली. नगरपरिषदेच्या प्रकल्प अधिकारी वैशाली पाटील यांनी सांगितले की, ३६५ विक्रेत्यांची नोंदणी झाली असून शहर फेरीवाला समितीने त्यांना मंजुरी दिली आहे. ओळखपत्र तयार करण्याचे काम प्रगतीपथावर असून लवकरच त्याचे वाटप करण्यात येईल.

### बारामती विधानसभा मतदारसंघाची प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध

**बारामती : दैनिक संध्या**

२०१ बारामती विधानसभा मतदारसंघातील मतदारांची प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार ही यादी तयार करण्यात आली असून, प्रारुप मतदार यादी सर्व मतदान केंद्र व तहसील कार्यालयात कार्यालयीन वेळेत पाहण्यासाठी उपलब्ध आहे. मतदार यादीबाबत दावे व हरकती २९ सप्टेंबर २०२६ पर्यंत नोंदविण्याचे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी उत्तम दिघे यांनी केले आहे. मतदार यादी तयार करण्यासाठी १ ऑक्टोबर २०२६ या अर्हता दिनांकावर निश्चित करण्यात आली आहे. या अर्हता दिनांकाच्या संदर्भात मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट करण्यासाठी कोणत्याही दाव्याचा किंवा नावाच्या समावेशाबाबत आक्षेपाचा अर्ज संबंधित मतदार नोंदणी कार्यालयात सादर करता येणार आहे. तसेच, १ ऑक्टोबर २०२६ रोजी १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या पात्र नागरिकांनी मतदार यादीमध्ये आपले नाव समाविष्ट करण्यासाठी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज करावा, असे आवाहनही करण्यात आले आहे. पात्रतेनुसार प्राप्त दावे व हरकतींची छाननी करून त्यावर नियमानुसार निर्णय घेण्यात येणार आहे. नागरिकांनी आपले दावे किंवा हरकती सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांच्या कार्यालयात, संबंधित निवडणूक विभागाच्या मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) किंवा तहसील कार्यालय, प्रशासकीय भवन, पहिला मजला, बारामती येथे सादर करावेत, असे श्री.दिघे यांनी कळविले आहे.



### सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांकडून बँक अधिकाऱ्यांचा गौरव

**सासवड : दैनिक संध्या**

सन १९६४ ला स्थापन झालेल्या बँक ऑफ इंडियाच्या सासवड शाखेने ६२ व्या वर्षी अनेक बाबतीत उल्लेखनीय उद्दिष्टपूर्ती व कौतुकास्पद कामगिरी पार पाडली आहे. त्यांच्या या यशाचा यापूर्वी शाखेत काम केलेल्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना देखील अभिमान आहे. या अनुषंगाने सेवानिवृत्त मंडळींनी शाखेत जाऊन बँक शाखाधिकारी सचिन दोलताडे व अन्य कर्मचाऱ्यांचा भेट वस्तू देत गौरव केला व त्यांचे अभिनंदन केले. रमेश कानडे, विलास मोकाशी, हेमंत ताकवले, काळुराम घारे,दत्तात्रय शेटे, मंजुषा निरगुडे, संजय कांबळे व दिलीप गिते या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी यावेळी सध्या कार्यरत असलेल्या स्टाफचा सन्मान केला. रमेश कानडे, दत्तात्रय शेटे, संजय कांबळे यांनी मनोगतातून सेवाकाळातील आठवनींना उजाळा दिला. हेमंत ताकवले यांनी प्रास्तविक केले.शाखाधिकारी सचिन दोलताडे यांनी शाखेच्या एकूण प्रगतीचा आढावा घेत या सत्कारामुळे ऊर्जा मिळाल्याची भावना व्यक्त केली. ऐश्वर्या काळे, रुपेश वाझे, नगमा शाहीन, निलेश सातपुते अंजली झगडे, उत्कर्ष सुतार, नामदेव कामठे या बँक कर्मचाऱ्यांसह सूडलाईफ विमा कंपनीचे धर्मराज कोळेकर, महेश कुलथे आदी मंडळी याप्रसंगी उपस्थित होती.



# संघर्ष, साधना म्हणजे आशाताई : श्रेया घोषाल

## पं. हृदयनाथ मंगेशकर यांच्या हस्ते श्रेया घोषाल यांना आशा भोसले पुरस्कार प्रदान

■ **पिंपरी (दै. संध्या)**

संघर्ष, साधना म्हणजे आशाताई भोसले, अशा महान व्यक्तींच्या नावाचा पुरस्कार मिळणे हा माझ्यासाठी अत्यंत मोठा सन्मान आहे. लतादीदी, आशाताई, हृदयनाथजी आणि उषाताई यांची गाणी ऐकून मी मोठी झाले. संगीतातील "सा" देखील यांच्यामुळेच शिकले. मी स्वतःमध्ये आशाताई आणण्याचा प्रयत्न करते. माझे पहिले मराठी भाषेतील गाणे 'गणराज रंगी नाचतो' हे रेकॉर्ड झाले तेंव्हा मी १३ वर्षाची होते. आशाताईंची गाणी ऐकून मला प्रेरणा मिळते. भाऊसाहेब भोईर यांच्या निमंत्रणाचा मी स्वीकार करते आणि लवकरच पिंपरी चिंचवड शहरासाठी एक सांगीतिक कार्यक्रम करेल असे आश्वासन आंतरराष्ट्रीय ख्यातीची गायिका श्रेया घोषाल यांनी "२१ वा आशा भोसले पुरस्कार" स्वीकारल्यानंतर मनोगत व्यक्त करताना दिले.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पिंपरी चिंचवड शाखा, पिंपरी चिंचवड कलारंग प्रतिष्ठान आणि सिद्धिविनायक ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय स्तरावर संगीत क्षेत्रात उल्लेखनीय योगदानाबद्दल यावर्षीचा हा २१ वा प्रतिष्ठित 'आशा भोसले पुरस्कार २०२६' सुप्रसिद्ध पार्श्वगायिका श्रेया घोषाल यांना ज्येष्ठ संगीतकार पं. हृदयनाथ मंगेशकर यांच्या हस्ते शनिवारी, (दि. २९) प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवड येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य सोहळ्यात प्रदान करण्यात आला.

यावेळी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पिंपरी चिंचवड शाखा अध्यक्ष भाऊसाहेब भोईर, आमदार अमित गोरखे, माजी महापौर व ज्येष्ठ नगरसेवक योगेश बहल, पिंपरी चिंचवड मनपा आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, उद्योजक कृष्ण कुमार गोयल, नगरसेवक गौरव घुले तसेच मानसी भोईर- घुले, वंदना घांगुर्डे, रुणाल सांकला, दिलीप काटकर, हर्षवर्धन भोईर, किरण येवलेकर, राजू बंग, गौरी लोंढे आदी उपस्थित होते. हा पुरस्कार रु. १,११,०००/- रोख, शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह पं. हृदयनाथ मंगेशकर यांच्या हस्ते आणि पैठणी मानसी भोईर-घुले यांच्या हस्ते श्रेया घोषाल यांना प्रदान करण्यात आली. पंडित हृदयनाथ मंगेशकर यांनी श्रेया घोषाल यांना आशीर्वाद देताना सांगितले की, श्रेयाला मी लहानपणापासून बघतो आहे. सर्वप्रथम षण्मुखानंद हॉलमध्ये माझेच गाणे गाताना मी तिला पाहिले. तेव्हाच तिला तू खूप छान गाते, असा आशीर्वाद दिला आहे. आता भाऊसाहेब भोईर आमदार व्हावेत अशी इच्छा आहे. आ. अमित गोरखे यांनी सांगितले की, भाऊसाहेब भोईर हे या शहराचे सांस्कृतिक मंत्री आहेत. भोईर जर यापूर्वी भाजपमध्ये आले असते तर, आज ते राज्याचे सांस्कृतिक मंत्री झाले असते. अजूनही वेळ गेली नाही, असे म्हणताच प्रेक्षकांनी उत्स्फूर्तपणे टाळ्यांचा कडकडाट करून आ. गोरखे यांना प्रतिसाद दिला.

स्वागत, प्रास्ताविक करताना भाऊसाहेब भोईर यांनी सांगितले की, या सांगीतिक प्रवासाचा श्वास लतादीदी आहेत, तर उच्छवास आशादीदी आणि याचे हृदय म्हणजे पंडित हृदयनाथ मंगेशकर आहेत. लता मंगेशकर यांना देश सन्मानाने दीदी म्हणतो तसेच आता श्रेया घोषाल या आमच्या "छोटी दीदी" आहेत. त्यांनी पिंपरी चिंचवड शहरात कार्यक्रम करण्यासाठी वेळ द्यावा असा आग्रह केला. याला श्रेया घोषाल यांनी देखील हात उंचावून होकार दर्शविला.

आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी सांगितले की, आशा भोसले यांच्या नावाने दिला जाणारा हा पुरस्कार म्हणजे पिंपरी चिंचवड शहराचा सन्मान आहे.

पुरस्कार वितरण सोहळ्यात मोरया थिएटर निर्मित 'आशा से श्रेया तक' हा विशेष सांगीतिक कार्यक्रम झाला. यावेळी श्रेया घोषाल यांच्या हस्ते मानसी भोईर-घुले यांच्या "मानसी रेस्कोर" या बँडचे अनावरण करण्यात आले. आशा भोसले आणि श्रेया घोषाल यांच्या गाजलेल्या सदाबहार गीतांच्या मैफलीचा रसिकांनी आनंद लुटला. यावेळी मानसी भोईर-घुले यांनी देखील गाणी गायली.

तसेच या पुरस्काराच्या गौरवशाली परंपरेची माहिती देणारी चित्रफीत सादर करण्यात आली. यामध्ये सन २००२ पासून अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, पिंपरी चिंचवड शाखेतर्फे हा राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार दिला जातो. यापूर्वी हा सन्मान गानकोकिळा स्व. लता मंगेशकर, संगीतकार खय्याम, रवींद्र जैन, बप्पी लहरी, प्यारेलालजी, आनंदजी, पं. हृदयनाथ मंगेशकर, उषा मंगेशकर, अनु मलिक, शंकर महादेवन, पं. शिवकुमार शर्मा, सुरेश वाडकर, हरीहरन, सोनू निगम, सुनिधी चौहान, पद्मभूषण उदित नारायण, रूपकुमार राठोड, अवधूत गुप्ते, डॉ. सलील कुलकर्णी आणि शान (शांतनू मुखर्जी) यांसारख्या संगीतातील दिग्गजांना प्रदान करण्यात आला असल्याची माहिती देण्यात आली.

## चाकणमध्ये वाहतूक कोंडीमुळे नागरिक रडकुंडीला, ठोस उपाययोजना करण्याची मागणी

■ **चाकण (दै. संध्या)**

रस्त्यांची दयनीय अवस्था, मोठमोठे खड्डे, गतिरोधक असून नसल्यासारखे, विद्युत दिव्यांची वाणवा, सिग्नल यंत्रणेचा अभाव आदी समस्यांमुळे चाकण मधील परिस्थिती दिवसेंदिवस अत्यंत गंभीर होत चालली असून, वाढत्या वाहतूक कोंडीमुळे नागरिक अक्षरशः रडकुंडीला आले आहेत.

चाकण हे आता शहर राहिले नसून एक आंतरराष्ट्रीय औद्योगिक केंद्र झाले आहे. त्या मानाने चाकण परिसरातील पायाभूत सुविधा आणि वाहतूक नियोजन अत्यंत तोकडे पडत आहे. चाकण मधील वाहतूक कोंडी ही केवळ गैरसोय नसून ती आता नरकयातना झाली आहे. चाकण मध्ये रस्त्याच्या दुतर्फा असलेली अनधिकृत दुकाने आणि टपऱ्यांमुळे रस्ते अरुंद झाले आहेत. नियोजनशून्य पार्किंग बनले आहे. अवजड वाहने, ट्रक, कंटेनर रस्त्याच्या कडेलाच उभी केली जात आहेत. यामुळे खऱ्या अर्थाने शहरात वाहतुकीला अडथळा होतो.

अरुंद रस्ते आणि उड्डाणपुल असून नसल्यासारखे आहेत. वाढत्या वाहनांच्या तुलनेत रस्त्यांचे रुंदीकरणही रखडलेले आहे.



विरुद्ध दिशेने येणारी वाहने आणि सिग्नल यंत्रणेचा अभाव आहे.

चाकण नगरपरिषदेने पोलिसांच्या मदतीने जुन्या पुणे नाशिक रस्त्यावरील चाकण हद्दीतील अतिक्रमणे कायमस्वरूपी हटविण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. नो पार्किंग झोनची कडक अंमलबजावणी करून चाकण मधील मुख्य चौकात आणि रस्त्यांवर उभ्या राहणाऱ्या जड वाहनांवर जप्तीची कारवाई होणे अपेक्षित आहे. नगरपरिषदेने स्वतःचे ट्रॅफिक वॉर्डन्स नेमून पोलिसांना मदत करणे आवश्यक आहे. औद्योगिक वसाहतीत ट्रकसाठी शहराबाहेर हक्काच्या पार्किंगची सोय करण्याची गरज आहे.

प्रशासकीय यंत्रणा ढिम्म झाल्या आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष झाल्याने चाकण मधील वाहतूक कोंडीचा विषय संपूर्ण राज्यात चर्चिला जात आहे. प्रशासनाने तातडीने यावर ठोस उपाययोजना करण्यासाठी वरिष्ठांकडे पाठपुरावा केला पाहिजे, असे संकेत मेदनकर यांनी सांगितले.

## चाकण पोलीस ठाणे हद्दीत अवैध धंद्यांचा धुमाकूळ

■ **चाकण (दै. संध्या)**

विषारी गावठी दारू, गुटखा, विनापरवाना देशी विदेशी दारूची विक्री, गॅस रिपेलिंग आदी धंद्यांचा चाकण पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोठ्या प्रमाणात धुमाकूळ सुरू आहे.

तीन महिन्यांपूर्वी पिंपरी - चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत घडलेल्या भीषण विषारी गावठी दारू दुर्घटनेनंतर पोलीस प्रशासनाने कडक पावले उचलत अवैध व्यवसायांविरोधात विशेष मोहीम उघडली होती. या कारवाईमुळे काही काळ अवैध धंद्यांना चाप बसला होता. मात्र अवघ्या काही महिन्यांतच चाकण उत्तर आणि दक्षिण पोलीस ठाण्यांच्या हद्दीत हेच व्यवसाय पुन्हा उघडपणे राजरोस सुरू झाले आहेत.

औद्योगिक क्षेत्र तसेच महामार्गालगतचे ढाबे, हॉटेल्स आणि आडवळणाच्या ठिकाणी देशी-विदेशी मद्याची बिनदिक्कत विक्री सुरू आहे. रात्रीच्या वेळी या प्रकारांमध्ये मोठी वाढ होत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. नियमबाह्य लॉजिंग व असुरक्षितता वाढली आहे. परिसरातील काही लॉजमध्ये संशयास्पद आणि नियमबाह्य प्रकार सुरू असून, तेथे येणाऱ्या जाणाऱ्या व्यक्तींमुळे स्थानिक नागरिक, विशेषतः महिलांमध्ये असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे.

गुटखा तस्करी व बेकायदा गॅस रिफिलिंग तेजीत सुरू आहे. राज्यात बंदी असतानाही गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थांची गुपचूप विक्री सुरू आहे. तसेच दाट लोकवस्तीच्या आणि मोकळ्या जागांवर होणाऱ्या बेकायदा एलपीजी गॅस रिफिलिंगमुळे मोठ्या अपघाताची भीती व्यक्त केली जात आहे.

नागरिकांचे प्रश्न आणि कडक कारवाईची मागणी होऊ लागली आहे. पोलीस प्रशासनाकडून वेळोवेळी कारवाया होत असल्याचा दावा केला जात असला,

तरी प्रत्यक्ष वस्तुस्थिती वेगळी असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. कारवाईनंतर काही दिवसांतच हे धंदे पूर्ववत कसे सुरू होतात, असा सवाल आता नागरिक विचारत आहेत.

## गणित प्रज्ञा व प्रावीण्य परीक्षा बौद्धिक विकासासाठी उपयुक्त : प्राचार्य नंदकुमार सागर

■ **जेजुरी(दै. संध्या)**

महाराष्ट्र राज्य गणित अध्यापक महामंडळ व पुणे जिल्हा गणित अध्यापक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने सन २०२५-२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता पाचवी, आठवी व दहावीच्या गणित प्रज्ञा व प्रावीण्य परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा वाघोली येथील बी. जे. एस. शैक्षणिक संकुलात उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बालभारतीचे गणित विषयाचे विशेषाधिकारी बाळकृष्ण मापारी होते. यावेळी राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त प्राचार्य तसेच महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक महामंडळाचे सचिव नंदकुमार सागर, बी. जे. एस. कॉलेजचे प्राचार्य संतोष भंडारी, गणित अध्यापक मंडळाचे सल्लागार मच्छिंद्र वीर, भारत काळे, विद्या समिती प्रमुख देविदास शिंदे, स्वान रिसर्च अँड स्टडी फाउंडेशनचे शशिकांत कांबळे आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना नंदकुमार सागर म्हणाले की, विद्यार्थ्यांचे गणित विषयाचे ज्ञान अद्ययावत करण्यासाठी शिक्षक व विद्यार्थ्यांनी विषयाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी पाठांतरावर भर न देता कृतीयुक्त गणित अध्ययनाला प्राधान्य द्यावे. गणित अध्यापक महामंडळाच्या विविध परीक्षा विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमता विकसित करण्यासाठी उपयुक्त ठरत असल्याचे त्यांनी सांगितले. मच्छिंद्र वीर यांनी विद्यार्थ्यांसोबत गणित शिक्षकांनीही आपले ज्ञान अद्ययावत ठेवणे गरजेचे असल्याचे सांगितले. अध्यक्षीय भाषणात बाळकृष्ण मापारी यांनी महाराष्ट्र राज्य मंडळाचा अभ्यासक्रम क्षमताधिष्ठित असून, बदलत्या मूल्यमापन पद्धती




शिक्षकांनी आत्मसात करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. विद्यार्थ्यांमध्ये गणित विषयाची आवड निर्माण करण्यासाठी विषय कृतीयुक्त व सोप्या पद्धतीने शिकविण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. पुणे जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील १५० गुणवंत विद्यार्थ्यांना स्मृतिचिन्ह, सन्मान पदक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी सेवानिवृत्तीनिमित्त देविदास शिंदे, मुख्याध्यापकपदी पदोन्नती मिळाल्याबद्दल भारत काळे, काशिनाथ पोखरकर व मदन गायकवाड, डॉक्टरेट मिळाल्याबद्दल डॉ. कल्याण कडेकर व डॉ. वैभव बेंडाळे तसेच संस्थेच्या कार्यकारिणी सदस्यपदी निवड झाल्याबद्दल भगवान पांडेकर यांचा विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सचिव सचिन धनवट, कार्याध्यक्ष संदीप लोणकर, कोषाध्यक्ष योगेश माळशिरसकर, मारुती मांढरे, शरद जाधवर व विजय फापाळे यांनी विशेष परिश्रम घेतले.